22 TO 28 FEB 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 20/02/2021 9:24 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : ९ | सोमवार दि. २२ फेब्रुवारी २०२१ ते रविवार दि. २८ फेब्रुवारी २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## तहसील कार्यालयातील बाबूंची मुजोरी भलतीच वाढली शेतमजुराच्या विधवेला मारहाण करून बाहेर काढली



आत्महत्याग्रस्त संजीव

देवणी/शकिल मणियार

सरकारी कार्यालयात कोणत्या न कोणत्या कामासाठी येणाऱ्या लोकांना आवश्यक ती मदत करणे आणि त्यांच्याशी सौजन्याने वागणे हे प्रत्येक सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. पण आजकाल सरकारी अधिकारी आणि कर्मचारी इतके मुजोर झालेत कि एकीकडे पैसे घेतल्याशिवाय कुठले काम करीत नाहीत आणि ज्याच्याकडून त्यांना पैसे मिळण्याची अपेक्षा नसते अशा माणसाचे काम ते मुद्दाम रखडवतात आणि याबाबत कुणी जाब विचारला कि त्याला मारहाण करायलाही मागेपुढे पाहत नाहीत. सरकारने अशा घटनांची दाखल घेऊन संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. अन्यथा लोक कायदा हातात घेऊन या मुजोर सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात घुसून मारायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. शेवटी लोकांनी किती आणि का सहन करायचे ज्या लोकांना जनतेच्या कारच्या पैशातून पगार मिळतो त्यांनी जनतेचे मालक म्हणून नव्हे चाकर म्हणून सेवा बजावायला हवी. पण आजकाल सरकारी कार्यालयात बड्या अधिकाऱ्यांच्या समोर लोकांना मारहाण केली जात आहे.

देवणी तहसील कार्यालयातील मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल!



देवणी येथे एका आत्महत्याग्रस्त शेतमजूराची पत्नी आणि तिचा भाऊ तहसील कार्यालयात काही कागदपत्रे मागण्यासाठी गेली असता तहसिलदार सुरेश घोळवे यांच्या समोरच तहसील कार्यालायातील कर्मचाऱ्यांनी या गरीब बहिण भावाला बेदम मारहाण केली. इतकेच नव्हे त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार करू नये ...पान ६ वर

### तहसीलदारांची मुजोरी; मातंगला मारहाण

देवणी तहसील कार्यालयातले कर्मचारीच मुजोर आहेत असे नाही, तर खुद्द तहसीलदार सुरेश घोळवे हे सुद्धा लोकांशी उद्धटपणे वागतात. लॉकडाऊनच्या काळात त्यांनी एका मातंग समाजाच्या गरीब इसमाला मारहाण केली होती. पण हे प्रकरण दाबण्यात आले. त्यामुळे देवणी तहसिल कार्यालय हे जनतेचे सेवा केंद्र नसून आपल्या बापजाद्यांचा चिरेबंदी वाडा आहे आणि आपण तिथे कसेही उन्मतपणे वागू शकतो असा घोळवे यांचा समाज झाला आहे. त्यामुळे त्यांची चौकशी करून पिढीत लत्ता डब्बे आणि तिच्या भावाला न्याय मिळायलाच हवा अशी आग्रही मागणी लोकं करीत आहेत.

## लग्नाला नकार मिळताच ड्रायव्हरचे डोके फिरले वडिलांना जखमी करून माय लेकीला ठार मारले

पनवेल/क्राईम रिपोर्टर

आपल्याला जी गोष्ट आवडते ती आपल्याला मिळायलाच हवी असा काही लोकांचा अट्टाहास असतो. पण जर ती मिळाली नाही, तर त्यांचे मानसिक संतुलन बिघडते आणि मग ते कुठल्याही थरला जाऊ शकतात. खास करून असा माणूस जर अशिक्षित असेल तर रागाच्या भरात तो कसलाही विचार करीत नाही आणि अशा माणसाच्या हातून मग काहीही घडू शकते. पनवेल नजीकच्या दापोली गावात एका विधुर डम्पर चालकाला एक तरुणी आवडली होती आणि तिच्या सोबत त्याला लग्न करायचे होते. पण तिच्या घरच्यांनी नकार दिल्यामुळे त्याने रागाच्या भरात तिच्या घरात घुसून तिच्यासह तिच्या आई वडिलांवर प्राणघातक हल्ला केला. त्यात आई आणि मुलीचा जागीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेले वडील रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. आरोपी मात्र फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पनवेल नजीकच्या दापोली गावात सिद्धार्थ वळखंडे हे त्यांची पत्नी व मुलीसह राहत होते. ते मुळचे मराठवाड्यातले होते. त्यामुळे मराठ वाड्यातीलच एका डम्पर चालकाच्या कुटुंबाशी त्यांची ओळख होती. त्या डंपर चालकाचे त्यांच्या घरी जाने येणे होते. दरम्यान त्याच्या पत्नीचे निधन झालेले असल्याने त्याला सिद्धार्थ वळखंडे यांच्या मुलीशी लग्न करायचे होते हि बाब त्याने वळखंडे कुटुंबियांना बोलून दाखवली. पण त्यांनी नकार दिला. त्यामुळे डम्पर चालक चिडलेला होता. शुक्रवारी तो रागाच्या भरात वळखंडे यांच्या घरात घुसला आणि त्याने पुन्हा सुजाता वळखंडे हिला लग्नाची मागणी घातली. पण तिने आणि तिच्या आई-वडिलांनी नकार देताच डम्पर चालकाने खिशातला चाकू काढून सुजाता, तिचे वडील सिद्धार्थ आणि आई सुरेखा यांच्या वर सपासप वार केले. यात सुजाता आणि सुरेखा या मायलेकी जागीच ठार झाल्या. तर सिद्धार्थ गंभीर जखमी झाले. दरम्यान हल्लेखोर पळून गेला. त्यानंतर शेजाऱ्यांनी सिद्धार्थ वळखंडे यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी विरुद्ध दुहेरी खुनाचा तसेच खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरु आहे.

## गुंडांच्या टोळीला त्या दोघांचा संशय आला पोलिसांचा खबरी समजून एकाचा गेम केला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत आकाश

गुंड टोळ्यांना पोलिसांच्या खबऱ्यांपासून नेहमीच धोका असतो. म्हणूनच एखाद्याचा त्यांना संशय जरी आला तरी ते त्याला जिवंत सोडत नाहीत. खबरी असल्याच्या संशयातून अनेक निरपराध लोकांना आपला जीव गमवावा लागलाय. नाशिकमध्ये अशाच एका घटनेत केवळ पोलिसांचा खबरी असल्याच्या संशयावरून दोन तरुणांवर एका गुंड टोळीने प्राणघातक हल्ला केला. यात एकाचा मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला असून या प्रकरणी पोलिसांनी त्या गुंड टोळीतील सहा जणांना अटक केली आहे.

खबरी हे पोलिसांचे नाक, कान आणि डोळे असतात. खबऱ्यांच्या खबरीवर पोलिसांचा तपास आणी धाडसत्र सुरु असते. खबऱ्यांचे नेटवर्क व्यवस्थित चालवण्यासाठी त्यांना वेळोवेळी आर्थिक मदत पोलिसांकडून केली जात असते. प्रसंगी जीवावर उदार होवून काही खबरे एखादी पक्की खबर आणत असतात. गुन्हेगारांच्या टोळीतील एखादा सदस्य दुखावला अथवा असंतुष्ट असला म्हणजे तो पोलिसांना टिप देवून आपले इस्पित साध्य करुन घेत असतो. कधी कधी आपल्याच टोळीतील कुणी सदस्य पोलिसांना माहीती देत असल्याचा संशय टोळीतील इतर ...पान २ वर

## दारूच्या नशेत त्यांच्याकडून भलतेच झाले चोर समजून त्यांनी निरअपधाला ठार केले

रावेर/क्राईम रिपोर्टर



मयत सौरभ

कुठल्याही माणसाने रात्री अपरात्री अनोळखी शहरात फिरू नये. कारण एकतर पोलीस पकडण्याची शक्यता असते किंवा असा माणूस चोर समजून लोकांच्या तावडीत सापडून मारला जाऊ शकतो. गेवराईत राहणाऱ्या आणि चांगल्या कुटुंबातील सौरभला भटकंतीची सवय होती. घरातून बाहेर पडून तो आठ आठ दिवस भटकत राहायचा. मात्र हि भटकंतीच त्याच्या प्राणावर बेतली. कारण रात्रीच्या वेळेस एका पण टपरीवर उभा असताना त्या पण टपरीचा मालक आणि त्याचे तीन मित्र दारूच्या नशेत तेथे आले आणि पण टपरीजवळ उभ्या असलेल्या सौरभला त्यांनी चोर समजून बेदम मारहाण केली. त्यातच त्याचा मृत्यू झाला. मात्र या हल्लेखोरांना पोलिसांनी शोधून काढले आणि त्यांच्या मुसक्या आवळल्या.



सौरभ गणेश राऊत हा चार बहिणींचा एकुलता एक भाऊ होता. बिड जिल्ह्यातील गेवराई येथील चिंतेश्वर नगर भागातील रहिवासी असलेल्या व कापड दुकानावर रोजंदारीने काम करणाऱ्या गणेश बाबुराव राऊत यांचा मुलगा सौरभ हा घरात सर्वाचा लाडका होता. संतापी स्वभाव असलेला सौरभ कुठेही कोणत्याही गावाला निघून जात असे. आठ आठ दिवस तो घरी परत येत नव्हता. मिळेल ते अन्न खावून तो दिवस काढत होता, अन्यथा उपाशीच रहात होता. भटकंतीची सवय असलेला सौरभ फिरत फिरत जळगाव जिल्ह्याच्या सिमेवरील रावेर या तालुक्याच्या ठिकाणी २ फेब्रुवारी रोजी आला. चुलत भावाने वापरण्यासाठी दिलेला शर्ट त्याने घातला होता. रावेर या अनोळखी शहरात तो इकडून तिकडे भटकत होता. मिळेल ते खायचे आणि रात्री इकडून तिकडे भटकंती करायची असा नेहमीचा कार्यक्रम त्याने ...पान २ वर

## कौटुंबिक वादातून संसाराची वाताहत झाली पत्नीला ठार मारून पतीने आत्महत्या केली



मुंबई/राजेंद्र वेदांते

आजकालच्या तरुणींना एकत्रित कुटुंबात राहायला आवडत नाही. कारण त्यांना राजा-राणीचा संसार हवा असतो. अशावेळी पती जर तिचे ऐकत नसेल तर घरात कुटुंबातील लोकांशी तिची नेहमीच भांडणे होतात. खास करून बायकोच्या डोक्यातील हा वेगळेपणाचा विचार आणि त्यातून रोज होणारी भांडणे पतीसाठी भयंकर त्रासदायक ठरतात. ठाण्यातील अशाच एका कुटुंबात वेगळेराहण्यावरून कलह सुरु होता आणि यालाच कंटाळून संतापाच्या भरात पतीने पत्नीची हत्या केली आणि त्यानंतर गळफास घेऊन स्वतःही आत्महत्या केली. या घटनेमुळे इंदिरा नगर परिसरात खळबळ माजली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

कौटुंबिक कलह हा कधीही संसारासाठी धोकादायक असतो. पती-पत्नीचा वाद विकोपाला गेला की संसाराची वाट लागते. संसारात वादाची ठिनगी पडता कामा नये. पती किंवा पत्नीने भांडणात माघार घेतली कि कितीही मोठा वाद असला तरी तो शमलाच पाहिजे. पण तसं होताना दिसत नाही. भांडणात माघार घ्यायला कुणी तयार नसल्यामुळे पती-पत्नीच्या वादात एकाचा जीव जातो. यानंतर पश्चात्तापाची वेळ येते. रागाच्या भरात दोघापैकी ऐकाची हत्या झाल्यावर ती व्यक्ती भानावर येते. तेंव्हा त्याचा राग शांत होतो. तेंव्हा त्याला कळते की आपल्या हातून फार मोठी घोडचूक झाली आहे. पण आत्ता पश्चात्ताप करण्यात काहीच अर्थ नसतो. पती-पत्नीच्या भांडणाच्या वेळी त्यांच्या घरातील सासू-सासरे, दिर, भावजय यांना ...पान २ वर

## सासूरवाडीत येऊन त्याने हंगामा केला जावयाच्या हातून मेव्हणा व सासरा मेला

अमरावती/क्राईम रिपोर्टर

संशयी माणूस हा स्वतःच्या हातानेच आपला विनाश ओढून घेतो. खास करून पत्नीवर संशय घेणाऱ्या माणसाचे मानसिक स्वास्थ इतके बिघडून जाते कि सतत त्याच्या मनात पत्नीच्या चारित्र्या बाबतचे विचार घोळत असतात. अशा माणसाला कुणी कितीही समजावले तरी तो ऐकत नाही. अशावेळी सासरच्या मंडळीनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला तर त्याचा संशय अधिकच वाढतो आणि तो पत्नीला शिवीगाळ आणि मारहाण करू लागतो. अमरावती मधल्या महावीर कॉलनीत राहणाऱ्या रवी पर्वतकर हा नेहमी पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करायचा. एकदा तर त्याने सासुरवाडीत जाऊन सासरा आणि मेव्हण्या समोर पत्नीला मारहाण करायला सुरवात केली. यावेळी चिडलेल्या मेव्हणा व सासऱ्याने सुद्धा त्याला चापटवले. पण रवीच्या खिशात चाकू होता. त्याने आपल्यावर हल्ला करणाऱ्या मेव्हणा आणि सासऱ्यावर सपासप वार करू त्यांची हत्या केली आणि पळून गेला. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्याला अटक केली.



अमरावती शहरातील महावीर कॉलनीत रवी सुरेश पर्वतकर हा आपल्या पत्नीसह राहयला आहे. त्याचे अमरावती जिल्हयातील कुरडपर्णा येथील बंडू साबळे यांची मुलगी हर्षा सोबत लग्न झाले होते. त्यांच्या लग्नला जेमतेम चार पाच वर्ष झाली होती. त्याची पत्नी हर्षा हिचे बारावी पर्यत शिक्षण झाले होते.तर रवी याचे जेमतेम शिक्षण झाले होते.तो एका एमआयडीसीतील कारखान्यात कामाला जात होता. त्यावरच त्याच्या कुंटूबाचा उदरनिर्वाह होत होता. सकाळी कामाला गेला की तो रात्री उशिराच घरी परतत होता. त्यातच हर्षा ही दिवसभर आपल्या मोबाईलवरून कुणाशी तरी ...पान २ वर

## जमिनीच्या वादातून दारुडा मुलगा चिडला मित्रांच्या मदतीने बापाचाच काटा काढला



मयत संपत



सातारा/क्राईम रिपोर्टर

दारूच्या नशेमुळे माणूस कर्जबाजारी होतो आणि एकदाका त्याच्या डोक्यावरचा कर्जाचा बोजा वाढत गेला मग त्याच्यावर घरातले दाग दागिने शेतीवाडी अगदी पत्नीचे मंगळसूत्रही विकण्याची पाळी येते. अशावेळी कुटुंबातील कुणी त्याला विरोध केला, तर तो रक्ताच्या नात्याचाही विचार करीत नाही. खटाव तालुक्यातल्या दरजाई गावात दारूच्या आहारी गेलेल्या एका इसमाने कर्ज फेडण्यासाठी बापाच्या मागे जमीन विकण्याचा तगादा लावला होता. पण बापाने जमीन विकण्यास नकार देताच या वाया गेलेल्या मुलाने आपल्या मित्रांच्या मदतीने बापाचाच खून केला.

वडिल आपले ऐकत नसल्याने तो ही त्याच्यावर चिडून असतो. वडिल आणि मुलाच्या नात्याला काळीमा फासणारी घटना बुधवार दि.१७ फेब्रुवारी २०२१ रोजी रात्रीच्या सुमारास खटाव तालुक्यातील दरजाई गावात घडली. मुलानेच आपल्या दोन मित्राच्या मदत्तीने वडिलांचा खून केला होता. ...पान ६ वर

## सूनबाईच्या हातून भलतेच घडून गेले वरवंटा डोक्यात घालून सासूला ठार केले

कर्जत/धर्मानंद गायकवाड



मयत तारामती

कुटुंबात भांड्याला भांडे हे लागतेच आणि सासू सुने मधील वाद हा काही नवा नाही. कारण पूर्वी सुना सासूच्या नजरेच्या धाकात असायच्या आता मात्र पतीला मुठीत ठेवणाऱ्या आजकालच्या विवाहितांना सासूची अरेरावी अजिबात सहन होत नाही. अशावेळी पतीला मुठीत ठेवणारी पत्नी एकतर सासू सासऱ्याला वृद्ध आश्रमात पाठवण्याची व्यवस्था करते किंवा सासूचा कायमचा काटा काढते. कर्जत तालुक्यातील बेकरे गावात एका सुनेने सासूच्या डोक्यात वरवंटा घालून तिची हत्या केली आणि स्वतःही विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी सुनेला ताब्यात घेतले आहे.

कर्जत तालुक्यांतील बेकरे गावात आज खळबळ माजली आहे. येथे सासूच्या डोक्यात वरवंटा टाकून सुनेने सासूचा खून केल्याची घटना घडली आहे. तारामती पांडुरंग कराळे (७५ वय) असे हत्या झालेल्या महिलेचा नाव असुन आरोपी सुनेस ...पान ६ वर

## प्रेयसीच्या ब्लॅकमेलिंगमुळे त्याचे मनोधैर्य खचले प्रियकराने तिला शेतात बोलवून दगडाने ठेचले




सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

अनैतिक संबंध माणसाच्या आयुष्याची वाट लावतात संसार उध्वस्त करून टाकतात तसेच अशा संबंधातून ब्लॅकमेलिंगचे प्रकारही घडत असल्याने माणसाचे मानसिक स्वस्थ बिघडते आणि तो बैचेन होतो अशा माणसाच्या हातून एखादा गंभीर गुन्हा ही घडू शकतो. करमाळा तालुक्यातील वीट गावात अशीच एक घटना उघडकीस आली आहे. या ठिकाणी एका इसमाचे गावातल्याच एका विवाहीतेशी गेल्या दीड वर्षापासून अनैतिक संबंध होते. मात्र तर ती त्याच्याकडे पैशाची मागणी करू लागली. पैसे दिले नाहीस तर पोलिसांकडे जाईन अशी धमकी देऊन त्याला ब्लॅकमेल करून त्याच्याकडून पैसे उकळू लागली. त्यामुळे चिडलेल्या त्या इसमाने संधी साधून तिला शेतात बोलावले आणि तिथेच दगडाने ठेचून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. ...पान २ वर

CMYK

22 TO 28 FEB 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 20/02/2021 9:25 PM Page 1



पान १ वरून....

## गुंडांच्या टोळीला त्या दोघांचा संशय...

सदस्यांना येत असतो. मग त्यातून कुरापती काढून गुन्हेगारांच्या टोळीत वाद निर्माण होत असतात. या वादातून कधी कधी प्राणघातक हल्ला होत असतो तर कधी कधी एखादा जिवानिशी ठार होत असतो. पोलिसांचा खबरी असल्याच्या कारणातून नाशिक शहरात टोळक्याने एका तरुणावर प्राणघातक हल्ला व त्यातून खूनाची घटना ८ फेब्रुवारी रोजी घडली. गुन्हेगारी टोळीने पुन्हा डोके बाहेर काढल्याचे चित्र या घटनेतून दिसून आले आहे. भांडण सोडवण्यासाठी मधे आलेल्या तरुणावर प्राणघातक हल्ला झाल्याने तो गंभीर जखमी झाला. नाशीक शहरातील महालक्ष्मी चाळीत राहणारा आकाश संतोष रंजवे आणि त्याचा मित्र करण हे दोघे रात्री घराच्या अंगणात बसले होते. त्यावेळी संशयित विशाल बनेवाल, सतीश टाक, पवन टाक, आकाश टाक, निखिल टाक, अभय बनेवाल, हरिष पवार, मनीष डुलगज, शिवम पवार आणि त्याच्या साथीदारांनी तू हमारे भाई की खबर पुलिस को देता है' असा वाद घालून आकाश रंजवे आणि त्याचा मित्र करण यांच्यावर चॉपर, तलवार, चाकू आणि लोखंडी रॉडने हल्ला केला. या हल्यात आकाश रंजवे गंभीर जखमी झाला. त्याला सोडवण्यास गेलेल्या करण याच्यावर देखील टोळक्याने हल्ला केला. या हल्लयात करण देखील गंभीर जखमी झाला. नातेवाईकांनी दोघांना तात्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र उपचारादरम्यान आकाशचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच भद्रकाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संशयितांच्या मागावर पथक पाठवले. यातील सहा संशयित ताब्यात घेण्यात आले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक साजन सोनवणे यांच्या पथकाने ही कारवाई केली. ८ फेब्रुवारी रोजी रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास मातंगवाडा येथील महालक्ष्मी चाळ परिसरात घडलेल्या या प्रकाराने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. याप्रकरणी बनेवाल टोळीच्या सहा संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले. टोळीप्रमुख विशाल बनेवाल याच्यासह तीन ते चार संशयित मात्र फरार होण्यात यशस्वी झाले. विशाल बनेवाल हा तडीपार गुंड आहे. द्वारका परिसरातील मातंगवाडा शहर व परिसरात तडीपार गुन्हेगारांची दहशत सुरुच असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांचे कान, नाक, डोळे म्हटले जाणारे व झिरो नंबर पोलिस म्हणून काम करणाऱ्या खबऱ्यांना गुन्हेगारांनी टार्गेट करण्यास सुरुवात केली आहे. काही दिवसांपासून पोलिसांना माहिती देतो या कारणातून प्राणघातक हल्ले होण्याचे प्रमाण वाढले आहे. या वाढत्या घटना पोलिस दलात नक्कीच विचार करणाऱ्या आहेत. खबऱ्यांच्या जीवावर पोलिसांनी अनेक क्लिष्ट गुन्हे उघड केले आहे. मात्र, अशा जीवघेण्या हल्लयांमुळे पोलिसांना कुणी माहितीच देणार नाही. याची गंभीर दखल पोलिस यंत्रणेने घेणे गरजेचे आहे. या घटनेतील मृत्युमुखी पडलेल्या आकाश रंजेवेच्या नातेवाइकांनी पोलिस स्टेशनला एकत्र येत संशयितांना तत्काळ अटक करण्यासाठी ठिय्या आंदोलन केले. सहायक आयुक्त दीपाली खन्ना, निरीक्षक सोनवणे यांनी या प्रकरणात जे कोणी संशयित असतील त्यांना लवकरच अटक केली जाईल, असे आश्वासन दिले.

## प्रेयसीच्या ब्लॅकमेलिंगमुळे त्याचे मनोधैर्य ...

दिनांक १७.०२.२०२१ रोजी यातील मयत स्त्री ही रा. मौजे वीट ता. करमाळा जि. सोलापूर सकाळी १०:४५ वा.च्या सुमारास शेतात कामाकरीता गेली होती, मयत स्त्रीचा मुलगा शाळा सुटल्यानंतर शेताकडे जात असताना ओढयाजवळ त्याच्या आईचे चप्पल व स्कार्फ पडल्याचे दिसले. परंतू शोध घेवूनही आई कोठे दिसत नसल्याने म्हणून त्याने वडिलास फोनव्दारे कळविले, त्यावरून वडिल तेथे आले दोघांनी मिळून तिचा शोध घेतला असता तेव्हा सकाळी १०:४५ वा. ते दुपारी १४:४५ वा. चे दरम्यान मौजे वीट ता. करमाळा येथील वीट ते मोरवड जाणारे जुन्या रोडजवळील ओढयाजवळ बाभळीच्या झाडाखाली झुडपाचे आडोशास तिस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,अज्ञात कारणावरून दगडाचे सहाय्याने डोक्यात मारून गंभीर जखमी करून तिला जिवे ठार मारले आहे म्हणून अज्ञात व्यक्तीविरूध्द करमाळा पोलीस ठाणे गुरंन १५७/२०२१ भा.द.वि.का.क ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखून गुन्हयाच्या घटनास्थळी मा. पोलीस अधिक्षक श्रीमती तेजस्वी सातपुते मॅडम, अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अभिजित धाराशिवकर, विशाल हिरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, पोलीस निरीक्षक श्रीकांत पाडूळे व इतर पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी भेटी दिल्या होत्या. सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याकामी मा. पोलीस अधिक्षक श्रीमती तेजस्वी सातपुते मॅडम यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पोनि सर्जेराव पाटील यांनी त्यांचे नेतृत्वाखाली ०३ पथके तयार करून त्यांना गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याकामी गांवात तळ ठोकून योग्य ती माहिती संकलित करणेकामी सुचना दिल्या होत्या. सदर गुन्हयात कोणत्याही प्रकारचा पुरावा नसताना स्था.गु.शा.सोलापूर ग्रामीण कडून नेमलेली ०३ पथकास गावातून गोपनीय माहिती घेत असताना पथकास यातील मयत महीलेचा गावातील एका इसमासोबत वाद झाल्याची गोपनिय माहिती मिळाली होती. त्यावरून तपास पथकाने सदर संषयीत इसमास ताब्यात घेवून त्याचेकडे व्यवसायिक व कौशल्यपूर्ण तपास केला असता, तो सतत विसंगत उत्तरे व माहिती देत होता. त्यावरून त्याचा अधिक संशय बळावल्याने त्यास अधिक विश्वासात घेवून व कौशल्यपूर्ण तपास करता त्याने वादावादीतून सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिली आहे. सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्रीमती. तेजस्वी साततपुते, मा. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, सर्जेराव पाटील,यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे, शाम बुवा, पोलीस उपनिरीक्षक अमित सिद पाटील, स.फौ.खाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, राजेश गायकवाड, बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, मोहन मनसावाले, विजयकुमार भरले, सलिम बागवान, बापू शिंदे, रवी माने, लालसिंग राठोड, सचिन गायकवाड, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अजय वाघमारे, पांडूरंग काटे, चालक समीर शेख, केशव पवार यांनी बजावली.

## दारूच्या नशेत त्यांच्याकडून भलतेच...

रावेर येथे देखील राबवला. त्याच रात्री रावेर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक शितलकुमार नाईक हे गस्त घालत होते. गस्ती दरम्यान मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास त्यांना महेश विश्वनाथ महाजन, योगेश उर्फ भैय्या रमेश धोबी, विनोद विठ्ठल सातव आणि विकास गोपाळ महाजन असे चौघे मद्यपी तरुण शहरातील पेट्रोल पंपावर दिसले. एवढ्या रात्री कुठे फिरत आहात व काय करत आहात असा प्रश्न करत स.पो.नि. शितलकुमार नाईक यांनी चौघा तरुणांना हटकले. चौघा तरुणांनी दिलेल्या उत्तराने स.पो.नि. शितलकुमार नाईक यांचे पुर्ण समाधान झाले नाही. चौघे तरुण दारु प्यालेले होते. त्यामुळे त्यांची मानसिक आणि शारिरीक अवस्था योग्य नसल्याचे स.पो.नि. शितलकुमार नाईक यांनी ओळखले. त्यातील काही तरुणांना स.पो.नि.शितलकुमार नाईक ओळखत होते. तरीदेखील सावधगिरीचा उपाय म्हणून स.पो.नि. शितलकुमार नाईक यांनी चौघा तरुणांचे फोटो आपल्या मोबाईलमधे काढून घेतले. त्यानंतर स.पो.नि. शितलकुमार नाईक पुढील गस्तीसाठी रवाना झाले. या घडामोडीनंतर काही वेळाने चौघे मद्यपी तरुण शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आले. त्याठिकाणी त्यांची नजर एकट्याने भटकंती करणाऱ्या सौरभवर गेली. या चौकातील सप्तश्रृंगी पान सेंटर या टपरीजवळ सौरभ राऊत एकटाच उभा होता. बिड जिल्ह्यातील गेवराई येथील सौरभ राऊत रावेर शहरात एकदम नवखा होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील सप्तशृंगी पान सेंटर ही टपरी चौघा तरुणांपैकी एकाची होती. आपल्या टपरीजवळ हा नवखा तरुण कसा काय उभा आहे? तो पान टपरी फोडण्याच्या इराद्यात असल्याचा संशय चौघांना आला. त्यांनी दारुच्या नशेत त्याला इथे काय करतो असे म्हणत हटकले. सौरभच्या बोलण्यावर विश्वास बसत नसलेल्या चौघांनी मिळून त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याचे म्हणणे पुर्ण ऐकून घेण्याच्या मनस्थितीत कुणीच नव्हते. मद्यप्राशन केलेल्या तरुणांनी त्याला मोटारसायकलवर कसेबसे बसवले. त्याची हेळसांड करत चौघांनी त्याला शहरालगतच्या बुरहानपूर रस्त्यावरील गोवर्धनगरातील भूतबंगला म्हणून प्रसिद्ध असलेल्या घराच्या मागे आणले. याठिकाणी चौघा मद्यपींनी त्याच्या नाकातोंडावर मारहाण सुरु केली. मद्यपी तरुणांच्या बेदम मारहाणीत सौरभ जमीनीवर कोसळला. मद्याच्या नशेतील तरुणांच्या चेहऱ्यावर जणू काही क्रौर्य निर्माण झाले होते. मोठ्या रुमालाने गळा आवळून त्यांनी सौरभला थेट यमसदनीच पाठवले. मद्याच्या नशेत सौरभचा गळा आवळल्यानंतर चौघांनी तेथून पलायन केले. दुसऱ्या दिवशी ३ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता या जागेचे रखवालदार भागवत घमा महाजन तेथे पोहोचले. झाडांना पाणी देण्यासाठी ट्युबवेलकडे जात असतांना त्यांना सौरभचा मृतदेह दिसला. मयत सौरभ हा त्यांच्या दृष्टीने अनोळखी होता. त्यांनी या घटनेची माहिती शेतमालक पारस अग्रवाल यांना तातडीने दिली. शेतमालक पारस अग्रवाल यांनी अनोळखी मृतदेह शेतात निरखून पाहीला असता मयताचा गळा आवळून खून झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यांनी या अनोळखी मृतदेहाची माहिती लगेच रावेर पोलिस स्टेशनला कळवली. प्रभारी पोलिस निरीक्षक एस.बी.पाटील यांनी तातडीने आपले सहकारी स.पो.नि. शितलकुमार नाईक व सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठले. मयताच्या शर्टावर रिलायन्स टेलर-पैठण रोड औरंगाबाद असा टेलरमार्क दिसून आला. मयत हा नक्कीच औरंगाबाद परिसरातील असावा असा सुसंगत तर्क लावण्यात आला. मात्र तो रावेर येथे का व कसा तसेच कुणाकडे आला असावा हा देखील एक प्रश्न पोलिसांपुढे निर्माण झाला. मयताचा गळा आवळून मृत्यू झाल्याचा अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला. या प्रकरणी रावेर पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ३४/२१ नुसार अज्ञात आरोपीविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी यांनी या तपासकामी सखोल लक्ष घालण्यास सुरुवात केली. त्यांनी घटनेच्या रात्री शहरातील घडामोडींबाबतच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यात चौघे तरुण त्यांना संशयास्पद अवस्थेत मोटारसायकलने फिरतांना आढळून आले. या चौघा तरुणांपैकी एकाच्या गळ्यातील रुमालावर रक्ताचे डाग त्यांना आढळून आले. घटनेच्या रात्री सहायक पोलिस निरिक्षक शितलकुमार नाईक यांनी चौघा तरुणांना हटकले होते. चौघा तरुणांचा मोबाईलमधे फोटो देखील त्यांनी काढला होता. या माहितीच्या आधारे अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी यांनी तपासाला गती दिली. सीसीटीव्ही फुटेजमधील ते चौघे तरुण आणि स.पो.नि. शितलकुमार नाईक यांनी मोबाईलमधे फोटो काढलेल्या तरुणांच्या चेहऱ्यात साम्य आढळून आले.

शिवाय एका तरुणाच्या गळ्यातील रुमालाला लागलेल्या रक्ताच्या डागाचा प्रकार लक्षात घेता चौघांना चौकशीकामी ताब्यात घेण्याचे फर्मान अप्पर पोलिस अधिक्षक गवळी यांनी सोडले. चौघे तरुण रावेर येथील रहिवासी असल्यामुळे त्यांना ताब्यात घेत पोलिस स्टेशनला आणले गेले. चौघांची वेगवेगळ्या मार्गाने स्वतंत्रपणे चौकशी करण्यात आली. ताब्यातील चौघांपैकी एका तरुणाने पोलिसी खाक्या बघून लवकरच कबुली देण्यास सुरुवात केली. मयत तरुण हा आमच्यासाठी अनोळखी होता. तो पानटपरी फोडण्याचा तयारीत असल्याचा संशय आल्यामुळे मद्याच्या नशेत आम्ही त्यास मारल्याचे त्याने कबुल केले. गुन्ह्याची कबुली देणाऱ्या साथीदाराला त्याच्या तिघा साथीदारांसमोर हजर करण्यात आले. त्याने कबुली दिल्याचे बघून इतर तिघा साथीदारांनी देखील आपला गुन्हा कबुल केला. मद्याच्या नशेत व टपरी फोडत असल्याच्या संशयातून मारहाणीसह रुमालाने गळा आवळून खूनाचा प्रकार घडल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. त्यांनी दिलेल्या कबुली जवाबानुसार त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. मयताच्या शर्टावरील टेलरमार्क हाच एकमेव धागा त्याची ओळख पटवून देईल हे प्रभारी पोलिस निरिक्षक सुधीर पाटील यांनी ओळखले. मयताच्या शर्टावर न्यु रिलायन्स टेलर्स पैठण रोड औरंगाबाद असा टेलरमार्क होता. त्या टेलरकडून मिळालेल्या माहितीनुसार तो शर्ट परमेश्वर राऊत या हॉटेल मॅनेजरने शिवून घेतला होता. परमेश्वर राऊत याने तो शर्ट त्याचा चुलत भाऊ सौरभ राऊत यास वापरण्यासाठी दिलेला होता. मयताचा फोटो व शर्ट परमेश्वर राऊत यास दाखवला असता तो सौरभ राऊत असल्याचे निष्पन्न झाले. अशा प्रकारे मयत हा सौरभ राऊत असल्याचे निष्पन्न झाले.

अवघ्या ३६ तासात झालेल्या या खूनाच्या उलगड्याची माहिती पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे यांनी रावेर येथे पत्रकार परिषदेत दिली. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. प्रविण मुंडे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक शीतलकुमार नाईक यांना दहा हजार रुपयांचे आणि तपास करणाऱ्या पथकातील सर्वांना ३५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. मयताची ओळख पटवण्याकामी पो.नि. सुधीर पाटील यांचे तर आरोपींचा शोध लागण्याकामी स.पो.नि. शितलकुमार नाईक यांचे मोलाचे सहकार्य या तपासात लाभले.

## कौटुंबिक वादातून संसाराची वाताहत...

हि या भांडणाची झळ सोसावी लागते. कधी कधी या दाम्पत्याच्या भांडणामुळे हि जवळची नाती अडचणीत येतात.अशा घटना वारंवार सुरू आहेत. कुटुंबियांतील कलहामुळे कधी पती पत्नीला यमसदनी धाडतो तर कधी पत्नी-पतीला वेकुठात पाठवते. अशीच एक दुर्दैवी घटना ठाणे शहरातील इंदिरानगर भागात घडली. पतीने रागाच्या भरात पत्नीच्या डोक्यात होतोडा मारून तीची हत्या केली. संतापाच्या भरात केलेल्या या हत्याकांडाचा नंतर पतीला पश्चात्ताप झाला. व त्याने हि गळफास घेऊन आत्महत्या केली. हि घटना उघडकीस आल्यानंतर इंदिरानगर भागात प्रचंड खळबळ माजली होती. सुखी कुटुबात एकदा का कलीने प्रवेश केला की त्या कुटुंबाची राखरांगोळी होण्यास जास्त वेळ लागत नाही. तसेच कुटुंबियांतील या कलहामुळे पती-पत्नी संसाराचे सुख न घेताच वैकुठात पोहचले. या वादामुळे आपल्या संसारात चिंता, क्लेश, दुःख, दारिद्र्य येते. तरीही आजही पती-पत्नीतील वाद मिटण्याचे नाव घेत नाही. पती-पत्नीचा जोडा लक्ष्मी-नारायणाचा असावा, वेताळ अप्सरेचा नसावा. इंदिरानगर झोपडपट्टीत अरुंद घर, मोठा परिवार त्यातच कोरोनाचा काळ, घरात सासू आणि सून यांचा वारंवार होणारा संघर्षामुळे घराचे घरपण निघून जाते. ज्या घरात सुख नांदायला पाहिजे तिथे कलह सुरू झाला कि त्या संसाराचा विस्कोट झाल्या शिवाय राहत नाही. पत्नीच्या रोजच्या भांडणाला कंटाळून पतीने आपल्या पत्नीची डोक्यात हातोड्याचे प्रहार करून हत्या केली. हत्येनंतर पश्चातापात स्वतःही गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ठाण्याच्या श्रीनगर वागले इस्टेट परिसरात घडली आहे. श्रीनगर पोलिसांनी या हत्या प्रकरणी मृतक आरोपी आकाश बालाजी समुखराव याच्या विरोधात भादंवि ३०२ प्रमाणे खूनाचा गुन्हा दाखल केला.मात्र यातील आरोपी पतीने आत्महत्या केल्याने पोलीसांच्या तपासात काही राहत नाही. असे एका वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. हत्या आणि आत्महत्या अशा दुहेरी घटना ठाण्याच्या श्रीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६ फेब्रुवारी रोजी रात्री ११ ते १७ फेब्रुवारी सकाळी १० वाजेपर्यतच्या कालावधीत घडल्या आहेत. आत्महत्या करणारा पती मृतक आकाश बालाजी समुखराव (२९) यांनी आपली पत्नी अश्विनी आकाश समुखराव(१९) हिची हत्या प्रथम केल्याची माहिती श्रीनगर पोलिसांनी दिली. मृतक अश्विनी आणि मृतक आरोपी आकाश हे रणजित पांडुरंग शिरसाठ यांच्या इंदिरानगर येथील शिवमहिमा चाळीतील खोलीत राहत होते. परंतू पत्नी आश्विनीला एकत्र कुटुंबात राहयचे नव्हते. आपला वेगळा संसार थाटायची तिने स्वप्न पाहिली होती. वेगळे राहण्यावरून या पती-पत्नीत सातत्याने भांडणे होत होती. परंतू आता या कोरोनाच्या काळात पत्नीला घेऊन वेगळा संसार वाटायची रणजितची तयारी नव्हती. त्याची आर्थिक बाजू भक्कम नव्हती. म्हणून तो वेगळा संसार थाटायला तयार नव्हता. पण पत्नी आश्विनी त्याचे काही एक ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हती. रणजित घरी आला की तिची वेगळे राहण्याची किरकिर सुरू होत होती. रोजच्या या किरकीरीला तो कंटाळला होता. याच एका विषयावरून त्यांची सतत भांडणे होत होती.

त्या दिवशी अशीच भांडणाला सुरुवात झाली. दोघांमधील वाद विकोपाला गेला होता.तेंव्हा संतापाच्या भरात आकाश याने हातोड्याने पत्नी अश्विनीच्या डोक्यात प्रहार केले. घाव वर्मी लागल्याने व मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने अश्विनी तडफडत मरण पावली. त्यानंतर रणजितला पश्चात्ताप झाला. आपण आपला राग आवरता घेतला असता तर कदाचित आश्विनीला वाचली असती. पश्चातापात पती आकाश याने आपल्याच राहत्या घरात लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती १७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. मृतक आरोपीचे वडील बालाजी यांनी श्रीनगर पोलिसांना याबाबतची माहिती दिली. यामुळे वागळे इस्टेट परिसरात एकच खळबळ उडाली होती. पत्नीची हत्या आणि आरोपीची आत्महत्या केल्याची माहिती मिळताच घटनास्थळी सहाय्यक पोलीस उपायुक्त परिमंडळ-५, सहाय्यक पोलीस आयुक्त वागळे इस्टेट, विभाग ठाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व्ही.ए. शिंदे, पोलीस निरीक्षक प्रशासन, पोलीस निरीक्षक गुन्हे शिंदे यांनी भेट दिली. श्रीनगर पोलीस ठाण्यामध्ये मात्र मृतक आरोपी पती आकाश याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणात कौटुंबिक वादाने प्रकार घडला असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. श्रीनगर पोलीस हे अधिक तपास करीत आहेत.

## सासुरवाडीत येऊन त्याने हंगामा...

बोलत असायची, याचा राग रवीला येत होता. तो या कारणातून सारखे तिच्याबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत होता. यातूनच तो तिचे संबंध इतर कुणाशी तरी असल्याचा संशय घेत होता.लग्नाला चार पाच वर्ष झाली होती.त्यातच ती दिसायला देखणी आणि सुंदर होती. लग्नाअगोदरच तिचे तिच्या माहेरमध्ये कुणाशी तरी संबंध आहेत त्यामुळेच ती सारखी आपल्या बरोबर भांडण करून माहेरी जात असावी असा ही त्याला संशय येवू लागला. त्यातूनच त्याने तिच्या माघारी तिचा मोबाईल चेक केला होता. त्यातच एकाचा नंबरावरून तिचे सारखे बोलणे होत असल्याचे त्याच्या लक्षात आले होते. आपल्या पत्नीचे बाहेर कुणाशी तरी लफडे चालू आहे या संशयातून तो हल्ली दारूच्या व्यसनाच्या ही जास्त आहारी गेला होता. कामावरून घरी परत येताना तो दारू पिवून येऊ लागला. दारू पिऊन आल्यावर तो हर्षाबरोबर कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण उकरून काढून तिला मारहाण करीत होता.ती ही त्याचा मार खावून त्याला जशास तसे उत्तर देत होती.त्याचा रागीट आणि तापट स्वभाव असल्याने तिचे उलट उत्तर देणे त्याला खपत नव्हते. तुझे कुणाबरोबर संबंध आहेत. तु चांगली वागत नाहीस.

सारखी कुणाबरोबर तरी मोबाईलवरून बोलत असते. मी कामावर गेलो की तुझे बाहेरख्याली संबंध चालू असतात. तू अलिकडे बाहेरख्याली वागत आहेस असे आरोप तो तिच्यावर करीत होता. खरे तर तिचे बाहेर कोणाबरोबर ही लफडे किंवा तसले संबंध नव्हते. पण ती आपल्या मोबाईलवरून तासन तास कुणाबरोबर तरी बोलत असते या एका कारणातून रवी हा तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन शितोंडे उडवित होता. याचा तिला ही राग येत होता. आपण चांगले आणि व्यवस्थीत वागून ही नवरा आपल्यावर संशय घेऊन मारहाण करतो हे तिने माहेरी आपले वडिल बंडू आणि भाऊ धनजंय यांना सांगितलेले होते. तो सारखा मारहाण करीत असल्याने ती ही आपल्या माहेरी कुरडपर्णा येथे येवून राहत होती. ती माहेरी कुरडपर्णा येथे येऊन राहिली की चार आठ दिवसांनी रवी हा तिला न्यायला येत होता. त्यावेळी तिचे वडिल बंडू साबळे आणि भाऊ धनजंय यांनी त्या दोघांनाही समजावून सांगायचे. तर हर्षाचा आजा विश्वनाथ हे ही तिला व रवीला समजावून सांगत बाळानो लग्नाला चार पाच वर्ष झाली आहेत संसार चांगला करा. सारखे भांडण करीत बसू नका, तर रवीला ही त्यांनी तू आमच्या मुलीवर विनाकारण संशय घेऊ नकोस आमची मुलगी तू समजतोस तशी नाही. तिच्यावर आम्ही चांगलेच संस्कार केले आहेत अशी त्यांनी दोघांची समजूत काढली होती. संसार म्हटले की भांडयाला भांडे लागणार उगाच वाद घालीत बसू नका पुढे एक मुलबाळ झाल्यावर सगळे काही सुरळीत होईल असे ही त्यांनी त्यांना सांगितले होते.सासरवाडीत असताना तेवढयापुरते रवी हा त्याच्यासमोर मान हलवीत होता. नंतर अमरावती येथे आपल्या घरी गेला की दोन चार दिवसच तो गप्प बसत होता. त्यानंतर ही तो तिच्याबरोबर क्षुल्लक कारणातून भांडण उकरून काढीत तिला मारहाण करीत होता.त्या दोघांच्या भांडणात बऱ्याचवेळेला तिच्या माहेरच्या लोकांनी व रवीकडच्या नातेवाईकांनी ही मध्यस्थी केली होती.परंतू तरीही त्या दोघांचे भांडण काही केल्या मिटत नव्हते. मागचे तसे पुढचे असे त्या दोघांचे होत होते. कामावरून घरी दारू पिऊन आला की त्याचे भांडण हे ठरलेलेच असायचे. त्यामुळे त्याच्या भांडणाला सगळेच नातेवाईक वैतागलेले होते. तर रवीच्या मते आपले सासरे हे हर्षाला समजावून न सांगता मलाच दोषी ठरवून मलाच चांगले वागण्याचा सल्ला देत आहेत याचा त्याला राग येत होता. त्याने हर्षाचे बाहेर कुणाबरोबर तरी लफडे आहे म्हणूनच ती मोबाईलवरून त्याच्याशी तासन तास बोलते असे ही सांगून पाहिले होते. पण याचा उलटचा परिणाम झाला होता. हर्षाचे आई वडिल आणि भाऊ रवीलाच तू चांगले वाग. पत्नीला चांगले सांभाळ दारू पिऊ नकोस म्हणून सांगत होता. म्हणून तो त्याच्यावर चिडून होता.

शुक्रवार १२ फेब्रुवारी २०२१ रोजी रवीचे आणि हर्षाचे याच कारणातून भांडण झाले होते. या भांडणात तो पत्नी हर्षावर संशय घेऊन नेहमी प्रमाणे तिला मारहाण केली होतीतो तिला तुझे कुणाबरोबर संबंध आहेत हे विचारीत तिला चांगलचे झोडपून काढले होते. तिने त्याला माझे कुणाबरोबर ही बाहेर कसले ही संबंध नाहीत तुम्ही उगाच माझ्यावर संशय घेऊन माला मारहाण करू नका असे हात जोडून सांगितले परंतू तरीही त्याचा तिच्यावर विश्वास बसत नव्हता. त्या रात्री त्याने तिला जबर मारहाण केली होती. म्हणून ती दुसऱ्या दिवसी उठून आपले माहेर कुरडपर्णा गाठले होते. नेहमीप्रमाणे ती भांडण करून आली असल्याने तिच्या घरच्या लोकांनी तिला काही एक विचारले नाही. जावाई तिला न्यायला येईल त्यावेळी त्याला शेवटचेच विचारायचा असा त्यांनी निर्णय घेतला होता. नेहमीप्रमाणे ती भांडून गेल्यानंतर रवी हा १४ फेब्रुवारी रोजी आपल्या मोटार सायकलीने सासरवाडी कुरडपर्णा येथे गेला होता. तो आल्यानंतर तेथे ही त्याने पत्नी हर्षाला भांडण काढून तू मला न सांगता का तुझ्या माहेरी आलीस म्हणून विचारणा करून भांडण उकरून काढून तिला तेथे ही मारहाण करायला सुरवात केली. त्यावेळी तिच्या आई वडिलांनी आणि तिच्या भावाने त्याला शांत करण्याचा प्रयत्न करीत भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला खरा पण तो काही ऐकण्याच्या मनस्थीतीत नव्हता. उलट तो हर्षावर नको नको ते आरोप करीत होता. हे बघून मेहुणा धनंजय हा भावोजी रवी याला मारायला त्याच्या अंगावर धावून गेला. त्या दोघात भांडण होत असताना हर्षाचे वडिल ही जावायला मारहाण करायला त्याच्या अंगावर धावून गेले होते. रवी हा भांडण करण्याअगोदरच तिथे दारू पिऊन आलेला होता. त्यातच त्याचा स्वभाव रागीट आणि तापट असल्याने तो ते दोघे त्याला मारायला आल्यावर गप्प बसणाऱ्यातला नव्हता. त्याने येताना आपल्या खिशातून, एक धारदार चाकू आणलेला होता.तो त्यांना तुम्ही हर्षाला समजावून न सांगता मलाच का सांगत आहात? म्हणून त्याच्या अंगावर धावून गेला होता.

बघता बघता त्या भांडणात मोठी धुमचक्री उडाली होती. ते चाघे पाचजण रवीला मारायला आल्यावर त्याने ही आपल्या खिशाथून चाकू काढून सासरा बंडू साबळे याच्यावर सपासप वार केले त्याना सोडावयला आलेल्या मेहुणा धनंजय याच्यावर ही त्याने चाकूने सपासप वार केले. तर आजा सासरा विश्वनाथ यांच्यावर चाकूने वार केले. त्याने केलेल्या हल्लयात जागीच सासरा बंडू साबळे आणि मेहुण धनजय याचा मृत्यू झाला तर विश्वनाथ साबळे हे गंभीर जखमी झाले होते. या घटनेत सासऱ्याचा आणि मेहुण्याचा आपल्या हातून खून झाल्याचे बघून त्याने घाईघाईत पत्नी हर्षा हिला बळजबरीने आपल्या गाडीवर बसवले आणि तो पळून गेला. इकडे या घटनेची माहिती चांदूरबाजार पोलीस स्टेशनला मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनास्थळचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी अमरावती येथील सामान्य रुग्णालयात पाठवून दिले त्यांनी या घटनेची माहिती त्यांनी साबळे कुंटूंबाकडून घेतली होती. ही घटना कुणी आणि कशातून घडली याचा पोलीसांना अंदाज आलेला होता. या घटनेची फिर्याद साबळे कुंटुबियांनी चांदूरबाजार पोलीस स्टेशनला नोंदवली होती. या घटनेतील संशयीत आरोपी रवी पर्वतकर हा पलुन गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. त्याच्या मोबाईल लोकेशन पुणे येथील पिंपरी चिचंवड दाखवत होती. पोलीसांनी या घटनेची माहिती पुणे पोलीसांना दिली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे युनिट १च्या पोलीसांनी रवी पर्वतकर याच्या मोबाईलचे लोकेशन शोधून काढून त्याला पिंपरी चिचंवड येथून ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तर देत होता. त्याला पोलीसांनी आपला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला? याची माहिती त्याने पोलीसांना दिली होती. पिंपरी चिचवंड पोलीसांनी त्याला चांदूरबाजार पोलीसाच्या ताब्यात दिले होते. साबळे कुंटूबियांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी बंडू साबळे व धनंजय साबळे याच्या खून प्रकरणी व आजा सासरा विश्वनाथ साबळे यांना गंभीर जखमी केल्याप्रकरणी रवी सुरेश पर्वतकर (वय २२) रा.अमरावती याच्या विरोधात भा.दं.वी.३०२,२०१ व अन्य गुन्हाखाली त्याला ताब्यात घेऊन पोलीसांनी त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान त्याने गुन्हयात वापरलेला चाकू आणि त्याची मोटार सायकल पोलीसांनी जप्त केली होती. पोलीस चौकशीत त्याने पत्नी हर्षा हिचाही खून करण्यासाठी तिला आपल्या गाडीवर जबरदस्तीने बसवून नेल्याचे सांगितले. पण कालांतराने त्यचा विचार बदलला असल्याने त्याने तिला मारले नाही असे ही सांगितले.

या घटनेची प्रत्यक्ष साक्षीदार ही त्याची पत्नी हर्षा असल्याने पोलीसांनी तिच्याकडून ही सत्य जाणून घेतले होते.तिने ही पती रवीच्या विरोधातच पोलीसासमोर साक्ष दिली होती. या घटनेचा तपास स्थानिक युनिट १चे पोलीस निरी.अमर वाघमोडे, सहाय्यक निरीक्षक उमेश लोढे उपनिरीक्षक काळूराम लांडगे, पोलीस कर्मचारी अमित खानविलकर, सोमनाथ बोऱ्हाडे, गणेश महाडिक, सुनिल चौधरी, प्रमोद हिरळाकर, सचिन मोरे, मंगलवलवे, मंजूषा रोजाळे यांनी चांदूरबाजार पोलीसांच्या बरोबरीने समांतर तपास करून संशयीत आरोपी रवी पर्वतकर याला ताब्यात घेऊन या दुहेरी खूनाची उकल केली होती. या घटनेची माहिती प्रसार माधन्यामांना गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त डॉ.प्रशांत अमृतकर यांनी दिली.

# शिवगर्जनेने निलंगेकर मंत्रमुग्ध

## प्रसिद्ध गायक अवधुत गुप्ते संगीत रंजनी उर्स्फुत प्रतिसाद



**निलंगा/प्रतिनिधी**

अक्का फांऊडेशनच्या वतीने दरवर्षी निलंग्यात शिवजन्मोत्सव विविध उपक्रमाने साजरा करण्यात येतो. यावर्षी शिवजयंतीनिमित्त आयोजित उत्सवात प्रसिद्ध गायक अवधुत गुप्ते यांचा शिवगर्जना ही संगीत रंजनी आयोजित करण्यात आलेली होती. या कार्यक्रमाने निलंगेकरांना अवधुत गुप्ते यांनी मंत्रमुग्ध केलेले पाहण्यास मिळाले.कार्यक्रमाचा शुभारंभ श्रीमती सुशिलाबाई शिवाजीराव पाटील निलंगेकर, माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर, खासदार सुधाकर श्रृंगारे व युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या संकल्पनेतून व युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या पुढाकारातून अक्का फाऊडेशनच्या वतीने निलंग्यात प्रतिवर्षी शिवजयंतीनिमित्त विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात.यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने शिवजयंती साजरी करण्यास काही निर्बंध घातले होते. मात्र कोरोना संसर्गास प्रतिबंध घालणार्या सर्व उपाययोजना करून शिवजयंती साजरी करणारच असा निश्चय निलंगेकरांनी केला होता. त्यानुसार शिवजन्मोउत्सवाचा प्रारंभ अवधुत गुप्ते यांच्या शिवगर्जना या संगीत रंजनीने करण्यात आला.या कार्यक्रमाची सुरूवात जय जय महाराष्ट्र माझा, सह्याद्रीचा सिंह गर्जतो या गाण्याने अवधुत गुप्ते यांनी केला. यानंतर एकाहुन एक सरस गीते गाऊन अवधुत गुप्ते यांनी निलंगेकरांना मंत्रमुग्ध केले. काही गाण्यावर तर चक्क युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह उपस्थित रसिकांनी तालही धरलेला पाहण्यास मिळाला. विशेष म्हणजे शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या या कार्यक्रमास उपस्थित हजारो निलंगेकरांनी कोरोना संसर्गाला प्रतिबंध करणार्या सर्व उपाययोजनाचा अवलंब केलेला पाहण्यास मिळाला. कार्यक्रमाच्या मंध्यतरात माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर व आमदार रमेश कराड यांच्या हस्ते अवधुत गुप्तेसह त्यांच्या संगीत रंजनी चमुचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार निलंगेकर यांनी शासनाने शिवजयंती साजरी करण्यास निर्बंध घालणे ही शिवभक्तासाठी अन्यायकारी बाब असल्याचे सांगून महाराष्ट्रात शिवजयंती साजरी करणे हा गुन्हा आहे का असा प्रश्न उपस्थित करून हा जर गुन्हा असेल तर आमच्यावर गुन्हे दाखल होणे आमच्यासाठी भाग्याचेच असल्याचे सांगितले. आम्ही यापुर्वीच शिवजयंती डंकेकी चोट पे साजरी करणारच असा निश्चय केलेला होता. त्यानुसार आम्ही शिवजयंती साजरी करून दाखवली आहे. असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली शिकवण आणि घालून दिलेले आर्दश त्यानुसार काम करत असून आगामी काळात छत्रपती शिवाजी महाराजांची विकासाची संकल्पना मतदारसंघासह लातूर जिल्ह्यात राबविण्यासाठी आपण बांधिल असल्याची ग्वाही दिली.




## अहमदपूर वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.पाटील तर सचिवपदी ॲड.दराडे



**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर वकील संघाची सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली असून या बैठकीत वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. हेमंत पाटील यांची तर सचिवपदी ॲड. संतोष एस.दराडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. यावेळी ॲड. डि. एल. घोगरे, ॲड.एस.एस.कांबळे, ॲड. वाय.डि.फड, ॲड.जे.व्ही मद्रे, आर.एस केंद्रे, ॲड टि.एन कांबळे, ॲड. व्ही.एस भोसले, ॲड.व्ही.जी.कोरे ,ॲड. बी.व्ही जगताप, ॲड. आर. ई. भुरकापल्ले ॲड. राजेश मिरकले, ॲड. उमेश डांगे, ॲड.डी.एन. ईप्पर, ॲड. एस.आर. केंद्रे, ॲड.भास्कर मुंढे, ॲड. बी.के मुरकूटे, ॲड.अनिल.आर, ॲड सुहास पाटील, ॲड. प्रशांत कांबळे, नवटक्के, ॲड. अनवर सय्यद, ॲड. सोपान व्ही. शिवने, ॲड देमगुंडे, ॲड. सुहास भ.चाटे, ॲड. नागेश नवटक्के, ॲड. एस. बी फड, ॲड. सुहास देशमुख, ॲड. सुशिल कांबळे ॲड. सुदर्शन मुंढे, ॲड बालासाहेब बेनकुडे, ॲड. एल. एस. काथवटे, ॲड प्रशांत येरे, ॲड.व्हि.ए. सोनकांबळे, ॲड स्वप्नील व्हत, ॲड जुनेद सौदागर ॲड. सचिन राठोड, ॲड. ईरफान चौधरी आदींची यावेळी उपस्थित होती. तसेच वकीलसंघाच्या सचिवपदी अँड. एस.एस.दराडे, उपाध्यक्षपदी अँड.ए.बि.डख, सहसचिवपदी अँड. आर.बी.देशमुख, कोषाध्यक्षपदी आर.एस. कानवटे, ग्रंथपालपदी अँड. आर.डी. कांबळे यांची निवड करण्यात आलीनूतन कार्यकारणीचे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधिश संभाजी.द.ठाकरे साहेब यांनी अभिनंदन केले.

## जढाळा येथील शाळा दुरुस्तीसाठी लाच मागितल्याने ग्रामसेवकाला ३ वर्षांची शिक्षा

**चाकूर/करकरे अंबादास**

चाकूर तालुक्यातील जढाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील खोलीच्या दुरुस्तीसाठी केलेल्या कामाची १ लाख २२ हजार १८० रुपयांची मंजुरी घेऊन आलेल्या बिलाच्या चेकवर सही करण्याचे कामासाठी ग्रामसेवक श्रीकांत प्रभाकर पतंगे आणि डोंगरज येथील ग्रामसेवक प्रल्हाद नागनाथ कानुरे यांच्या विरोधात तक्रारदाराने लातूर जिल्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे तत्कालीन पोलीस उपाधीक्षक एन.जी.अंकुशकर यांच्याकडे तक्रार दिली की, बिलाची रक्कम देण्यासाठी आरोपींनी सात हजार रुपये लाचेची मागणी केली आहे त्या अनुषंगाने लाचलुचपत विभागाने सापळा रचून कार्यवाही केली.

लाचेची रक्कम हॉटेल मयूर येथे आरोपी क्रमांक दोन यांच्या मार्फत लाच स्वीकारली. सदर प्रकरणी शिक्षेची कारवाई नांदेड परिक्षेत्राच्या पोलीस अधीक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पोलीस उपाधीक्षक माणिक बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. याप्रकरणी सरकारी वकील संतोष देशपांडे, कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, कुमार दराडे, पोलीस हवालदार लक्ष्मीकांत देशमुख यांनी पार पाडली. याप्रकरणी चाकुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ३०२० /१२ कलम ७, १२, १३ (१) (ड) याच्यासह कलम १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरील प्रकरण लातूर येथील अतिरिक्त सत्र न्यायालय ०६ येथे चालले. याप्रकरणी आरोपी क्रमांक एक अर्थात श्रीकांत प्रभाकर पतंगे यास दोषी धरून कलम ७ अन्वये तीन वर्षे शिक्षा व दहा हजार रुपये दंड तसेच कलम १३ अन्वये तीन वर्षे शिक्षा व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली. दोन्ही शिक्षा एकदाच भोगायचे आहेत.

या प्रकरणातील आरोपी क्रमांक दोन प्रल्हाद नागनाथ कानुरे यास निर्दोष मुक्त करण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या धडक कारवाईने लातूर विभागात मोठा वचक लाचखोरावर निर्माण झाला आहे. लातूर विभागातील कोणत्याही नागरिकाला शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणत्याही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग लातूर यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा असे आव्हान पोलीस उपाधीक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे यांनी केले आहे.

## खाजगी कोचिंग क्लासेस, प्रशिक्षण संस्थांनी कोविड सुरक्षा नियमांचे तंतोतंत पालन करावे -जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी.



**लातूर/करकरे अंबादास**

लातूर, जिल्हयातील खाजगी कोचिंग क्लासेस, प्रशिक्षण संस्था येथे कोविड सुरक्षा नियमांचे (मास्कचा वापर, शारीरीक अंतर, सॅनिटायझर व स्वच्छता ई.) सक्तीने पालन करण्याचे आदेश देत आहे. सदर नियमांचे तंतोतंत पालन होत असल्याचे महानगरपालिका /नगर परिषद, पोलीस प्रशासना मार्फत पथक नियुक्त करुन उक्त नियमांची तपासणी करण्यासाठी वेळोवेळी अचानक भेटी देवून तपासणी करावी व नियमांचे पालन होत नसल्यास दंडात्मक कार्यवाही करावी व पुन्हा नियमांचे पालन होत नसल्याचे आढळून आल्यास सदर क्लास चालकाविरुध्द गुन्हे दाखल करुन क्लासेस सिल करण्यात यावेत, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष पृथ्वीराज बी.पी. यांनी दिले आहेत.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५, साथरोग प्रतिबंधक कायदा, १८९७ अन्वये दिलेल्या तरतुदीनुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार तसेच महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२० ई. मधील तरतुदीनसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी, व आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी,असे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी आदेशित केले आहे. शासन पत्रकान्वये शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात आली आहे. त्याअन्वये जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून मला घोषित करण्यात आले आहे. मागील काही दिवसांत कोविड-१९ रुगणांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर लावण्यात आलेले बहुतांश निर्बध हटविण्यात आले असून विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व राजनितीक व इतर कार्यक्रमात मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्याच बरोबर वातावरण बदलामुळे नागरिकांमध्ये सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी ई. कोविड सदृश्य लक्षणे दिसून येत आहेत. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक असून त्याचाच एक भाग म्हणून कोविड सुरक्षा नियमांचे सक्तीने पालन करण्याचे आदेश देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज यांनी सांगितले.

खाजगी कोचींग क्लासेस तसपाणी : ०१.सुर्यवंशी क्लासेस, ०२.कौशल्य कॅढमी, ०३. दिक्षा क्लासेस, ०४. आय.आय.बी. क्लासेस ऑफ बॉयलॉजी, ०५. स्टेप बाय स्टेप क्लासेस, ०६. फोर्स कॅढमी क्लासेस, ०७. विद्यालंकर क्लासेस, ०८. मोटेगाव क्लासेस,०९. रेणूकाई क्लासेस, १०. आरडीस केमीस्टी क्लासेस, १. नायडू क्लासेस व १२. जोशी क्लासेस मॅथ. उपरोक्त १२ खाजगी क्लासेसची तपासणी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी यांच्या पथकाने आज केली. व त्यातील आय.आय.बी. क्लासेस व आर.डी.केमस्टी क्लासेस मध्ये मोठया प्रमाणावर विद्यार्थी आढळून आल्याने संबंधित दोन्ही क्लासेसना नोटीस बजावण्याचे आदेश जिल्हाधिकारी पृथ्वीराज यांनी दिले असल्याचे उस्मानी यांनी दिली.

## गोंदेगावच्या सरपंचपदी तनुजा देशमुख, तर उपसरपंचपदी गितांजली स्वामी



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर तालुक्यातील गोंदेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी तनुजा पांडुरंग देशमुख यांची तर उपसरपंच पदी गितांजली शरणाप्पा स्वामी यांची बहुमताने निवड करण्यात आली. अध्यासी अधिकारी आंबेसंगे यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. सरपंच पदासाठी दोन व उपसरपंच पदासाठी २ अर्ज आली होते. त्यापैकी तनुजा देशमुख यांना बहुमत मिळाले म्हणून त्यांची सरपंच पदी निवड झाली उपसरपंच पदासाठी दोन अर्ज आली होती. त्यापैकी गीतांजली शरणाप्पा स्वामी यांची यांची उपसरपंच पदी बहुमताने निवड झाली. गोंदेगाव बचाव ग्रामविकास पॅनल तयार करून निवडणूक लढवली होती. या पॅनलचे सहा जण निवडून आले दुसऱ्या पॅनलचे तीन निवडून आले. सरपंच उपसरपंची निवड घोषित केल्यानंत पत्रकार प्राचार्य शंकर सोनवणे क्राईम संध्याचे जिल्हा प्रतिनिधी यांनी नूतन सरपंच व उपसरपंच व इतर सदस्यांचे क्राईम संध्याची डायरी देऊन व पुष्पहार देऊन स्वागत करून अभिनंदन केले. निवडणुकीच्या दिवशी काही अनूचित प्रकार घडू नये म्हणून म्हणून गातेगाव पोलीस ठाण्याचे साहायक पोलिस निरीक्षक विलासराव नवले यांनी तगडा बंदोबस्त तैनात ठेवला होता. याप्रसंगी चैनल प्रमुख बाबासाहेब देशमुख तलाठी, धुळे मॅडम, ग्रामसेवक हनवते, गावचे पोलीस पाटील अशोक सोनवणे व निवडून आलेले सदस्य विश्वनाथ खैरे, जयराम तुकाराम सोनवणे, केवळबाई उत्तरेश्वर देडे, विमलबाई ज्ञानोबा देडे, रामचंद्र देशमुख, अमन सुनील देशमुख, अमोल देडे, जयपाल देशमुख, बाळासाहेब देशमुख, रावण देशमुख, अरविंद देशमुख विश्र्वास देवडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. ही निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

## परभणी जिल्ह्यातील पालम तालुका आणि ६५ गावे नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाला गती द्यावी -गुलाबराव पाटील



**मुंबई/प्रतिनिधी**

अनेक दिवसांपासून रखडलेल्या परभणी जिल्ह्यातील पालम तालुका व ६५ गावे नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाला गती द्यावी असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्रालयात पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या योजनेचा आढावा घेण्यात आला. अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व गुणवत्ता परिक्षण पथक यांनी एकत्रितपणे या योजनेस भेट देऊन त्या भेटीचा निरीक्षण अहवाल पाणी पुरवठा विभागाच्या अपर मुख्य सचिवांकडे सादर करण्याचे निर्देश पाणीपुरवठा मंत्री पाटील यांनी यावेळी दिले. योजनेवरील प्रत्येक उपांगाचे किती काम झाले आहे याची पाहणी करून त्यानंतरच कंत्राटदाराविषयी योग्य तो निर्णय घेण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. पालम तालुका व ६५ गावे नळपाणी पुरवठा योजनेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद येथे बैठक आयोजित करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. यावेळी परभणीचे माजी खासदार सुरेश जाधव,पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. संजय चहांदे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किशोर राजे निंबाळकर यांच्यासह पाणीपुरवठा विभागाचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

22 TO 28 FEB 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 20/02/2021 9:26 PM Page 1



# आंदोलनजीवीच लोकशाहीचे खरे तारणहार!

अन्यायाच्या विरोधात शांततेने केलेली आंदोलने हा जनतेला लोकशाहीने दिलेला अधिकार आहे. आणि जगातील प्रत्येक देशातील जनतेने याच मार्गाने स्वातंत्र्य मिळवले आहे. आंदोलनाच्या मार्गानेच भारतीय जनतेने १५० वर्षांच्या ब्रिटिशांच्या गुलामीच्या बेड्या तोडून स्वातंत्र्य मिळवलंय. त्यामुळे आंदोलने हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा भाग आहे. गेल्या तीन महिन्यांपासून दिल्लीच्या सीमांवर शेतकऱ्यांचे जे आंदोलन सुरू आहे त्याला संपूर्ण देशातील जनतेचा पाठिंबा आहे. कारण हे आंदोलन अत्यंत शांततेच्या मार्गाने सुरू आहे. २६ जानेवारी रोजी घडलेल्या घटनेचा अपवाद वगळता या आंदोलनात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. त्यामुळं सर्वोच्च न्यायालयाला सुद्धा हे आंदोलन चुकीचे ठरवता आलेले नाही. केवळ पंतप्रधान मोदी त्यांचे सरकार तसेच त्यांचा भाजपा पक्ष आणि त्यांच्यात तालावर नाचणारे पाळीव इलेक्ट्रॉनिक मीडियावाले सोडले, तर कुणीही शेतकरी आंदोलनाला चुकीचे म्हणायला तयार नाही. असे असताना पंतप्रधान मोदी यांनी थेट संसदेत या आंदोलनकर्त्यांवर टीका करताना त्यांची आंदोलनजीवी अशी निर्भित्सना केली. लोकशाहीत शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे गुन्हा नाही याची पंतप्रधानपदावर बसलेल्या माणसाला जर कल्पना नसेल तर ते या देशातील १३० कोटी जनतेचे दुर्दैव म्हणावे लागेल. अन्यायाच्या विरोधात पेटून उठणारा केवळ भारतालाच नव्हे, तर जगातला प्रत्येक माणूस आंदोलनजीवी आहे. अगदी भाजपने जी सत्ता मिळवली ती आंदोलने करूनच मिळवली. मग ते राम मंदिरासाठी केलेलं आंदोलन असो, भ्रष्टाचार अथवा महागाईचा विरोधात केलेले आंदोलन असो! मग त्या आंदोलनात सहभागी झालेले भाजपवाले आंदोलनजीवीच होते आणि सध्या पश्चिम बंगालमध्ये भाजपवाल्यांचा ममतांच्या विरोधात जो दांडिया सुरू आहे त्यातही भाजपचे आंदोलन जीवी नेते आणि कार्यकर्तेच सक्रिय आहेत. कारण सत्ताधाऱ्यांकडून जेंव्हा सामान्य जनतेवर अन्याय केला जातो, तेंव्हा जनतेला आंदोलनाचे हत्यार उपसावे लागते आणि जनतेला आंदोलनाचा अधिकार संविधानानेच दिलेला आहे. पण केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून आणि मोदी पंतप्रधान झाल्यापासून ना खाता ना वही मोदी कहे वो सही अशा पद्धतीने कारभार सुरू आहे. त्यामुळे या देशात मोदी कधीही कोणालाही विचारात न घेता काहीही करू शकतात. अशावेळी त्यांच्या या मनमानीच्या विरोधात आवाज उठवून आंदोलन करणे हा गुन्हा आहे का? संसदेच्या मागील अधिवेशनात मोदी सरकारने जी तीन कृषी विधेयके बहुमताच्या बळावर मंजूर करून घेतली आणि नंतर कायदा केला त्याची शेतकऱ्यांनी मागणी केली होती का? तर अजिबात नाही! मग मागणी न करता जनतेवर एखादा कायदा लादणे हे लोकशाही शासन पद्धतीत बसते का? पण मोदी सरकार सत्तेत आल्यापासून ज्या गोष्टी मागितल्या जात आहेत, त्याकडे दुर्लक्ष करायचे आणि ज्याची आवश्यकता नाही त्या जनतेवर लादायच्या असे प्रकार सुरू झालेत. नोट बंदीची कुणी मागणी केलेली नव्हती. जपानकडून १ लाख कोटींचे कर्ज घेऊन मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरु करण्याची कुणी मागणी केली नव्हती. तरी सुद्धा हे निर्णय जनतेवर लादले गेले आणि हा एक प्रकारे अन्याय आहे. मग या अन्यायाच्या विरूद्ध आवाज उठवणे त्यासाठी आंदोलने करणे हा गुन्हा आहे का? आंदोलनजीवी असणे हा गुन्हा नाही. मात्र जात, धर्मजीवी असणे हा गुन्हा आहे. जो २००२ मध्ये गुजरातमध्ये घडला. ज्याने या देशात विद्वेशाची बीजे रोवली तो गुन्हा आहे. जातधर्म जीवी लोकांनी या देशाला दुसऱ्या फाळणीच्या उंबरठ्यावर आणून उभे केले आहे. त्यांना रोखण्यासाठी या देशातील बुद्धिजीवी लोकांनी रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे आणि स्वतःला आंदोलनजीवी ठरवणे हा खरं तर राष्ट्रधर्म आहे आणि म्हणूनच या देशाचं अखंडत्व आणि बंधुभाव कायम ठेवण्यासाठी प्रत्येक देशवासीयांनी आंदोलनजीवी बनायला हवे आणि पंतप्रधानांना ठणकावून सांगितलं हवे की होय आम्ही आंदोलन जीवी आहोत. हा देश या देशाची अखंडता आणि बंधुभाव कायम राखण्यासाठी या देशातील अन्नदात्याला संरक्षण देण्यासाठी आम्ही आयुष्यभर आंदोलन जिवीच बनून राहणार आणि आमचा हा लढा जातधरम जीवी. लोकांच्या विरोधात असाच कायम सुरू राहील. कोरोनाच्या भयंकर संकटातून हळूहळू सावरत असलेल्या या देशाला आता खऱ्या अर्थाने एकोप्याची गरज आहे. केवळ सबका साथ सबका विकास येवढं बोलून चालणार नाही, तर लोकांचा विश्वास जिंकणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. लोकांना जर एखादी गोष्ट नको असेल तर ती त्यांच्या गळी मारणे चुकीचे आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत सामान्य माणूस हा केंद्रबिंदू असतो जो कामगार आहे, जो शेतकरी आहे अशा घटकांसाठी सरकारने अधिक सक्रिय असायला हवे. पण आज अन्नदाता तीन महिने थंडी वाऱ्यात सीमेवर बसून आहे आणि सरकारने त्यांना वाऱ्यावर सोडले आहे. शेतकऱ्यांना जर तो कायदा नको असेल तर सरकार त्यांच्यावर तो लादण्याचा आणि त्यांचे आंदोलन चिरडण्याचा का प्रयत्न करीत आहे आणि सरकारच्या याच धोरणावर जगभरातून टीका सुरू झाल्यावर सरकारची चमचेगिरी करणारे इलेक्ट्रॉनिक मीडियावाले आणि कोणाच्या मैतालाही न जाणारे सेलिब्रिटी अचानक सरकारसाठी का धावून आले. सरकारच्या चांगल्या धोरणांना जरूर पाठींबा द्यायला हवा, पण जिथे सरकार चुकत असेल तिथे प्रमाणिकपणे विरोधसुद्धा करायला हवा. पण आज काही लोकं सरकारबरोबर राहून शेतकरी आंदोलनाला चुकीचे ठरवण्याचे आणि या आंदोलनात सहभागी असलेल्या शेतकऱ्यांना खलिस्तानवादी ठरवण्याचे पाप करीत आहे. त्यांची ही कृती लोकशाही विरोधी असल्याने देशवासीयांनी त्यांच्या या कृतीचा निषेध करायलाच हवा.

# 'लॉकडाऊन'ची आता भीती कशाला दाखवता?



मा जगभरात कोरोनाचां प्रादुर्भाव हळूहळू ओसरू लागलंय. रुग्ण संख्या आणि मृत्युदर झपाट्याने कमी होतोय. शिवाय आता कोरोना प्रतिबंधक लस आलीय. असे असताना मागील काही दिवसापासून रुग्ण संख्या थोडीशी वाढताच सरकार आणि प्रशासनाकडून भीती दाखवली जातेय. पुन्हा लॉकडाऊन करण्याचे इशारे देऊन जनतेत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय. अमरावतीसारख्या जिल्ह्यात एक दिवसाचा लॉकडाऊन करण्याची घोषणा करण्यात आली. पण लस उपलब्ध असताना पुन्हा लॉकडाऊन कशासाठी? कारण लॉकडाऊनच्या गेल्या सहा महिन्याचा काळात सर्वसामान्य माणसाने जे भोगले आहे त्याची साधी आठवण जरी झाली तरी अंगावर काटा येतो. आता कुठे लोकांना मोकळा श्वास घेण्याची संधी मिळतेय, अशा वेळी थोड्या फार प्रमाणात रुग्ण संख्या वाढली म्हणून पुन्हा लॉकडाऊनची भाषा केली जातेय. मग लस काय प्रशासनाच्या... भागात घालायला बनवली आहे? लस जर खरोखरच परिणामकारक आहे तर जे आता रुग्ण वाढले

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

आहेत त्यांना लस द्या किंवा लसीकरणाची मोहीम युद्ध पातळीवर राज्यात राबवा. म्हणजे कोणाला कोरोनाची लागणंच होणार नाही. बरे कोरोना पुन्हा जोर धरीत असल्याची कारणे अनेक आहेत. त्यातील पहिले म्हणजे सोशल डिस्टींगचे कुणीही पालन करीत नाही. ग्रामपंचायतीच्या निवडणूक निकाला नंतर विजयी उमेदवाराच्या मिरवणुका काढण्यात आल्या. त्यात प्रचंड गर्दी झाली. मुंबईच्या बेस्ट बसेसमध्ये पूर्वी प्रमाणेच प्रवाशांची चेंग्रा चेंग्री सुरू आहे. लग्न कार्यात वराती मधील नाच गाण्यांवर कोणताही निर्बंध नाही. मंदिरे खुली करण्यात आली आणि भक्तांची पूर्वी प्रमाणेच गर्दी उसळली. लोकल ट्रेन काही ठराविक वेळात सर्वांसाठी खुली केल्याने कोरोना वाढला असा दावा करणे चुकीचे आहे. कारण लोकल ट्रेन अत्यावश्यक सेवेतील लोकांसाठी असतानाही ट्रेनमध्ये प्रचंड गर्दी होत होती आणि रेल्वे प्रशासन तेंव्हा झोपा काढीत होते. टीसी आणि रेल्वे पोलिस गायब झाले होते. त्यामुळे सर्वसामान्य लोक सुद्धा खुलेआम् लोकल मधून प्रवास करीत होते. त्याच बरोबर सार्वजनिक परिवहन सेवांमध्ये नियमांचे खुलेआम उल्लंघन सुरू होते. रिक्षा आणि टॅक्सी मध्ये फक्त दोन प्रवाशांना प्रवासाची मुभा असताना चार चार प्रवासी बसवला जात होते. यात कित्येक रिक्षा चालक तर मास्क सुद्धा लावत नव्हते. मार्केटमध्ये सुद्धा प्रचंड गर्दी असायची. हॉटेल्स सुरू झाली, पण तिथेही नियमांचे कोणी पालन करीत नव्हते. चार दिवसांपूर्वी शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंतीच्या कार्यक्रमानिमित्त प्रचंड गर्दी झाली होती. खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमात लोकांना सोशल डिस्टिंगचं पूर्णपणे विसर पडला होता. तिथे आलेल्या शिव प्रेमिंचे सोडाच पण मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि इतर मान्यवर नेतेही जवळ जवळ बसले होते. मात्र त्यांनी जरी सोशल डिस्टिंग पाळले नसले तरी आपल्या भाषणात लोकांना सोशल डिस्टिंगबाबत उपदेश करायला मात्र ते विसरले नाहीत. अशी एकंदरीत स्थिती आहे. त्यामुळे कदाचित कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढला असेल पण आपले हे अपयश झाकण्यासाठी सरकार आता लोकल ट्रेन सर्वांसाठी खुली केल्यामुळे रुग्ण वाढले असा कांगावा करील. पण ते साफ खोटे आहे. तेंव्हा पुन्हा लॉकडाऊनची भाषा करण्यापेक्षा लॉकडाऊन मध्ये झालेल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करा, तरच पुढची परिस्थिती सुरळीत होईल.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# नियमांचे पालन करा अन्यथा लॉकडाऊनला सामोरे जा; यंत्रणांनी कर्तव्यात ढिलाई दाखवू नये -मुख्यमंत्री उद्धव ठाकरे



कोरोनाविषयक सर्वत्र दाखविल्या जाणाऱ्या बेफिकीरीबाबत चिंता व्यक्त करतानाच कोरोना नियंत्रणासाठी लागू असलेल्या नियमावलीची (एसओपी) कडक अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रशासनाला दिले. मास्क वापरा, गर्दी टाळा अन्यथा पुन्हा एकदा लॉकडाऊनला सामोरे जावे लागेल, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. सार्वजनिक कार्यक्रम, सभा, विवाह समारंभ आदींमध्ये उपस्थितांची संख्या मर्यादीत ठेवतानाच मास्क वापरणे बंधनकारक आहे. जे नियमाचे पालन करणार नाही त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

राज्यात काही जिल्ह्यांमध्ये कोरोना रुग्णांचे वाढते प्रमाण लक्षात घेता मुख्यमंत्र्यांनी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हा पोलिस प्रमुख यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव संजय कुमार, टास्क फोर्सचे सदस्य आदी उपस्थित होते. जिल्ह्यांचा आढावा घेऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, गेल्या काही महिन्यांमध्ये कोरोनाच्या रुग्णसंख्येत घट आल्याने नागरिकांमध्ये बेफीकीरी आली आहे त्यामुळे कोरोना प्रतिबंधासाठीच्या सूचनांचे पालन होताना दिसत नाही. लोकांमध्ये जरी शिथीलता आली असी तरी यंत्रणांमध्ये ती येऊ देऊ नका. नियमांची कडक अंमलबजावणी करा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. राज्यात सार्वजनिक ठिकाणी कोरोना नियमांचे पालन होताना दिसत नाही. त्यामुळे आंदोलने, सभा, मिरवणुका यांना परवानगी देऊ नये. विवाह समारंभामध्ये उपस्थितांच्या मर्यादेचे पालन केले जाते का याची यंत्रणेकडून तपासणी झाली पाहिजे. ज्या भागात रुग्ण संख्या वाढतेय तेथे कंटनेमेंट झोन करायची तयारी ठेवावी, असेही श्री.ठाकरे यांनी सांगितले. राज्यात महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना सर्वसामान्यांना लागू असून त्याला दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कोरोना उपचारासाठी जी क्षेत्रिय रुग्णालये करण्यात आली आहे त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घ्यावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण आणि शहरी भागात सार्वजनिक ठिकाणांचे, शौचालयांचे, बसस्थानके, उद्याने याठिकाणी निर्जतुकीकरणाचे काम हाती घ्यावे. नियमांचे पालन करायचे की पुन्हा लॉकडाऊनच्या दिशेने जायचे याची निवड लोकांच्या हातात आहे. त्यामुळे पुढच्या काळात अधिक खबरदारी घ्यावी, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. कोरोना नियंत्रणासाठी जिल्ह्यांना जो निधी देण्यात आला आहे त्यातील शिल्लक असलेला निधी ३१ मार्चपर्यंत वापरायला परवानगी देण्यात आली आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. जनारोग्य योजनेला मार्चपर्यंत मुदतवाढ देतानाच ज्या भागात जास्त रुग्ण आढळून येत आहेत तेथील सार्वजनिक कार्यक्रमांमधील गर्दी नियंत्रणात राहण्यासाठी प्रशासनाने लक्ष देण्याची सूचना आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केली.

महत्वाचे मुद्दे : कोरोनाचा संसर्ग वाढत असेल त्या भागात किंवा परिसरात टार्गेटेड पद्धतीने तपासण्या करा, एकेका रुग्णांचे किमान २० तरी संपर्क शोधलेच पाहिजेत. मधल्या काळात आपण माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम' राबवून राज्याचा आरोग्य नकाशा तयार केला. यातील सहव्याधी रुग्णांची परत आरोग्य कर्मचाऱ्यांनी विचारपूस सुरू करावी. ज्या ज्या व्यावसायिक संस्था, संघटना लॉक डाऊन उठविण्यासाठी आपणाकडे येत होत्या त्या सर्व संबंधित संस्था, संघटना यांच्याशी परत एकदा बोलून एसओपीची काटेकोर अंमलबजावणी होईल याची खात्री करून घ्यावी. जिथे कंटेनमेंट आवश्यक आहे तिथे ते करा व त्याची अंमलबजावणी करावी. बँक्वेट हॉलमध्ये कोणी विनामास्क आढळल्यास हॉल मालकावर कारवाई करावी. ज्या भागात रुग्ण आढळून येत आहेत तेथे जाऊन कोरोना चाचणी करावी. विवाह समारंभासाठी पोलिस परवानगी आवश्यक. बैठकीस मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशीषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, सचिव आबासाहेब जऱ्हाड, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय आदी उपस्थित होते.

## अनुंकपा तत्त्वावरील भरतीत उमेदवारांना टप्प्या-टप्प्याने सामावून घेण्यासाठी प्रस्ताव करावा - दत्तात्रय भरणे

**मुंबई/प्रतिनिधी**

अनुकंपा तत्त्वावरील भरतीसाठी पात्र उमेदवारांना न्याय देण्याचेच राज्य शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने ही भरती जलदगतीने व्हावी तसेच सध्याच्या प्रतीक्षा यादीतील सर्व उमेदवारांना टप्प्या-टप्प्याने सामावून घेता यावे यासाठी सर्वकष प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. प्रकल्पग्रस्त आरक्षणांतर्गत रिक्त जागांचा अहवाल महिन्याच्या आत सादर करावा अशा सूचनाही भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. अनुकंपा तत्त्वावरील भरती तसेच प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या भरतीच्या अनुषंगाने शिष्टमंडळांनी भरणे यांची मंत्रालयात भेट घेतली. आमदार प्रकाश आबीटकर, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव गीता कुलकर्णी, उपसचिव टिकाराम करपते आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळातील प्रतिनिधींनी विविध मागण्या सादर केल्या. रिक्त पदांची अनुपलब्धता किंवा भरतीसाठी कमी उपलब्ध होत असल्याने अनुकंपा तत्त्वावरील भरती बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित आहे. सद्यस्थितीत १० हजारावर उमेदवार अनुकंपा तत्त्वावरील भरतीसाठी प्रतीक्षा यादीत आहेत. अनुकंपा तत्त्वावरील सर्व उमेदवारांना भरतीमध्ये लवकरात लवकर सामावून घेण्यासाठी सन २००८ मध्ये सलग तीन वर्षात ५० टक्के, २५ टक्के आणि २५ टक्के अशा पद्धतीने सामावून घेण्यासाठी शासन निर्णय झाला होता. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने पुन्हा तशा पद्धतीचा शासन निर्णय करून अंमलबजावणी करण्यात यावी, आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. त्यावर उमेदवारांना



जलदरितीने सामावून घेण्याच्या दृष्टीने मंत्रीमंडळापुढे सादर करण्यासाठी प्रस्ताव तयार करावा, त्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असे भरणे यांनी सांगितले. प्रकल्पग्रस्त उमेदवारांना शासकीय, निमशासकीय सेवेत समांतर आरक्षण असून त्यांना सेवेत सामावून घेण्यासाठी सर्व विभागातील या घटकासाठीच्या रिक्त जागांची माहिती एक महिन्याच्या कालावधीत सादर करावी. या उमेदवारांना पुढील भरतीमध्ये प्राधान्याने सामावून घेण्यासाठी सकारात्मक विचार केला जाईल, असेही भरणे यावेळी म्हणाले.

## स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी कायदेशीर बाबी तपासून तात्काळ कार्यवाही करावी!

स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागामुळे आपण स्वातंत्र्याची फळे उपभोगत असून त्यांच्या कुटुंबियांप्रती आपण कायमच कृतज्ञ राहिले पाहिजे. स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने सध्याच्या तरतुदींबाबत कायदेशीर बाबी तपासून प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश सामान्य प्रशासन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांच्या शासकीय सेवेत भरतीच्या मागणीच्या अनुषंगाने राज्यमंत्री श्री. भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी आमदार प्रकाश आबीटकर, सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव टीकाराम करपते आदी उपस्थित होते. स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना पूर्वी शासकीय सेवेत थेट सामावून घेतले जात होते. त्यासाठी वय, शिक्षण तसेच त्या पदासाठीच्या अर्हता पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांची भरती ही परस्पर नियुक्ती (बॅक डोअर एन्ट्री) असल्याचा अर्थ काढला गेला आहे. त्यामुळे त्यामुळे हा अन्याय दूर व्हावा तसेच ४ मार्च १९९१ चा शासन निर्णय अजूनही रद्द झाला नसल्याने त्यानुसार स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने राज्यमंत्र्यांकडे केली. त्यावर या अनुषंगाने विधी व न्याय विभागाकडून तात्काळ अभिप्राय मागविण्यात यावा आणि यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही करावी, असे निर्देश भरणे यांनी दिले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# नवा भारत मातृशक्तीचा असेल -राज्यपाल

## एसएनडीटी महिला विद्यापीठाचा दीक्षांत समारोह




**मुंबई/प्रतिनिधी**

प्रत्येक क्षेत्रात महिला आपला ठसा उमटवत आहेत. कुलपती या नात्याने आपण उपस्थित असलेल्या प्रत्येक दीक्षांत समारोहात ५ सुवर्णपदके मुले तर ५० सुवर्णपदके मुली पटकावतात. त्यामुळे नवा भारत मातृशक्तीचा असेल, भगिनीशक्तीचा असेल, असे प्रतिपादन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचा ७० वा वार्षिक दीक्षांत समारंभ राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी यांच्या दूरस्थ उपस्थितीत बुधवारी (दि. १७) झाला. यावेळी भारतीय शिक्षण मंडळाचे अखिल भारतीय संघटन मंत्री मुकुल कानिटकर, विद्यापीठाच्या कुलगुरू शशिकला वंजारी, प्रकुलगुरू विष्णु मगरे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. एसएनडीटी विद्यापीठाचे संस्थापक महर्षी कर्वे यांच्या स्मृतींना अभिवादन करून राज्यपाल कोश्यारी म्हणाले, शिक्षण केवळ अर्थार्जनासाठी न राहता ते मूल्यांवर आधारित असावे. स्नातकांनी आपल्या डोळ्यांपुढे उच्च ध्येय ठेवून तसेच नीतीमूल्ये, सदाचार, त्याग व सेवाभाव अंगीकार करून वाटचाल केल्यास त्यांच्या वैयक्तिक उत्कर्षासह राष्ट्र उत्कर्ष साधला जाईल. असेही राज्यपाल कोश्यारी यांनी सांगितले.

दीक्षांत समारोहात स्नातकांना उद्देशून मातृ देवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, राष्ट्रदेवो भव हा उपदेश दिला जातो याचे स्मरण देऊन राज्यपाल कोश्यारी म्हणाले की, या उपदेशामध्ये मातृशक्तीला अग्रमान दिलेला आहे. आपल्या देशात कुमारी पूजा केली जाते. बंगालमध्ये तर सुनेला देखील बहुमाता म्हटले जाते, ही भारताची परंपरा आहे. प्रत्येक मुलगी ही लक्ष्मी, सरस्वती व दुर्गेचे रूप असून मुलींमध्ये सेवाभाव, वात्सल्य, त्याग व समर्पण भाव निसर्गदत्त असतो. त्यामुळे प्रत्येकाने मातृशक्तीला जागृत केल्यास आपल्याला सर्व क्षेत्रात सफलता मिळेल व त्यातून समाज व देश प्रगती करेल, असे राज्यपाल कोश्यारी यांनी सांगितले. दीक्षांत समारोहात विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यशास्त्र, आंतरशाखीय अध्ययन या शाखांमधील १६४८३ विद्यार्थ्यांना पदवी, पदविका व आचार्य पदव्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी १२० विद्यार्थ्यांना ७३ सुवर्ण पदके, एक रौप्य पदक व २१८ पारितोषिके प्रदान करण्यात आली. कुलगुरू शशिकला वंजारी यांनी विद्यापीठ अहवालाचे वाचन केले. परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. सुनील वाघमारे यांनी आभार प्रदर्शन मानले.

# देवणी येथे राष्ट्रवादीची आढावा बैठक संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथे बाजार समीती सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक पार पडली या बैठकीस पक्ष निरीक्षक म्हणून मुर्तुजा खान, प्रा.श्याम डावळे हे उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रवादीचे नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच, सदस्य, पॅनल प्रमुख यांचा सत्कार करण्यात आला. आणि होऊ घातलेल्या देवणी नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते प्रशांत बळते, राहुल चंद्रकांत बिरादार, जितेंद्र शीवगे, तबरेज जमादार,यांच्या सह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी देवणी तालुका अध्यक्ष प्रा.अनिल इंगोले, अनिल कांबळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कन्नाडे, सचिन गवळी, डॉक्टर सेल तालुकाध्यक्ष डॉ.मल्लिकार्जुन सुरशेट्टे, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष दत्ता चाळकापुरे शहराध्यक्ष अमरदीप बोरे, शहर कार्याध्यक्ष फिरोज शेख, अंकुश गायकवाड, इंद्रिस भातंब्रे, रवि बिरादार, हसन मोमीन, संतोष बोचरे, अनिल रोट्टे, व्यंकट बिरादार, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव, सचिन घाळे, सोमनाथ रावळे, संदीप पाटील, सिद्धेश्वर पाटील, मधुकर बिरादार, पिंटू पाटील, प्रशांत घोलपे यांच्यासह आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोहोळमध्ये टँकरमधून विनापरवाना मळीसह १२ लाखांचा मुद्देमाल हिवरे फाटा जवळ जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यात मोहोळ हद्दीत टँकरमधून विनापरवाना मळी (रसायन) घेऊन जाणारा टँकर मोहोळ पोलिसांनी पकडला असून याप्रकरणी दोघांविरोधात मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमारे ११ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केले आहे. दरम्यान अटक करण्यात आलेल्या आरोपीस न्यायालयासमोर उभे केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस शिपाई मंगेश बोधले, रवी बाबर, अमोल घोळवे यांचे पथक सोमवारी रात्री साडेदहाच्या सुमारास गस्त घालत असताना शेटफळ ते मोहोळ रस्त्यावर हिवरे फाटा येथे समोरून येणाऱ्या दहा चाकी टँकर (एमएच ११ एम ३७५७) थांबविला. त्यावेळी चालकाने अंधाराचा फायदा घेत पलायन केले. त्यांच्यासोबत असलेल्या साथीदार रवी पवार (रा.मुस्ती तांडा, पिंजारवाडी, ता. दक्षिण सोलापूर जि सोलापूर) याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता आंबट मळीसारखा वास येणारे रसायन असल्याचे दिसून आले. या रसायनाच्या परवानाबाबत तसेच परमिटबाबत चौकशी केली असता काहीही आढळून आले नाही. सदर मळी व टँकर असा एकूण ११ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केले आहे. याप्रकरणी रवी पवार व चालक जावेद या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या रवी पवार यास न्यायालयासमोर उभे केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याबाबतची फिर्याद पोलीस शिपाई बोधले यांनी दिली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल देवडे हे करीत आहेत.

# भारतरत्न पंडित भीमसेन जोशी जन्मशताब्दीनिमित्त शासनाच्यावतीने आणि सहकार्याने कार्यक्रमांचे आयोजन - उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

**मुंबई/प्रतिनिधी**



भारतरत्न पंडित भीमसेन जोशी जन्मशताब्दीनिमित्त शासनाच्यावतीने व सहकार्य राज्यभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून संगीत क्षेत्रातील विविध संस्था व प्रतिष्ठान यांनी या कार्यक्रमांच्या आयोजनसंदर्भात प्रस्ताव द्यावेत, असे आवाहन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केले. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला पंडित द.वि.काणेबुवा प्रतिष्ठानचे गोविंद बेडेकर, गायिका मंजुषा पाटील, डॉ.विनिता आपटे, डॉ. भरत बलवल्ली यांच्यासह सांस्कृतिक कार्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, पंडित द. वि.काणेबुवा प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकी जपत काही दिवसांपूर्वी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'खयाल यज्ञ' हा शास्त्रीय सांगितिक कार्यक्रम पुण्यात १००हून अधिक कलाकारांना घेऊन सादर केला. याच धर्तीवर राज्य शासनाबरोबर संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्याबाबत प्रस्ताव सांस्कृतिक कार्य विभागास त्वरित द्यावा. सध्या राज्यातील कोविड आणि एकूण परिस्थिती पाहून तसेच या प्रस्तावाबाबतचा अभ्यास सांस्कृतिक कार्य विभागामार्फत करण्यात येईल. विशेष म्हणजे या प्रस्तावामध्ये समाजमाध्यमांवरुन या कार्यक्रमाचे लाईव्ह स्ट्रिमिंग कसे करण्यात येईल याबाबतचेही नियोजन देण्यात यावे जेणेकरुन या सांगितिक कार्यक्रमांचा अनुभव सगळयांनाच घेता येईल. या कार्यक्रमासाठी २ कोटीचा निधी उपलब्ध करुन द्यावा, असे निर्देश डॉ.गोऱ्हे यांनी यावेळी दिले.

**महाराष्ट्रभर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन - अमित देशमुख**

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दी वर्षाला ४ फेब्रुवारी २०२१ पासून सुरुवात झाली असून वर्षभर विविध कार्यक्रमांद्वारे त्यांना मानवंदना देण्यात येणार आहे. तसेच या जन्मशताब्दीनिमित्त महाराष्ट्रभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. पंडितजींच्या शास्त्रीय संगीत क्षेत्रातील कार्याचा गौरव जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाच्या वतीने मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि त्यांच्या जन्मस्थळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांमध्ये शास्त्रीय गायन, वादन व नृत्य अविष्कार, किराणा घराणा परंपरा गायन, शास्त्रीय गायन, वादन व नृत्य जुगलबंदी, राज्यातील १० अकृषिक विद्यापीठातील युवा गायक, वादक, नृत्य कलाकारांचा कार्यक्रम, अभंगवाणी अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असणार आहे, असे देशमुख यांनी यावेळी सांगितले.

# राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी आयोजित महिलांसाठी मोफत आरोग्य शिबीर संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडी वाडा तालुक्याच्या वतीने रविवारी वाण आरोग्याचं मोफत महिला आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात जनरल मेडीकल चेकअप, बीपी, ऑक्सिजन लेवल, पल्स, एच.बी., डायबिटीज व महिलांचे मासिकपाळी विषयीच्या समस्या तसेच मोफत औषधे वाटप करण्यात आले. वाडा शहरात अनेक शिबीरे घेतली जातात त्यामुळे ग्रामीण भागातील नागरीकांना याचा लाभ घेता येत नाही म्हणून मृणाली नडगे यांनी हे शिबीर डाहे गावात घेतले आणि येथील महिलांनीही चांगला प्रतिसाद दिला.

सदर कार्यक्रम प्रसंगी नरेश आकरे-जि.प.गटनेते, प्रमोद अण्णा कोठेकर -पालघर जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष, रोहीदास पाटील-वाडा तालुकाध्यक्ष, अशोक गव्हाळे -जिल्हा सरचिटणीस, सुरेश पवार-जिल्हा सरचिटणीस, हरि दामा पाटील-जेष्ठ कार्यकर्ते, तारक जाधव-जिल्हाध्यक्ष सामाजिक न्याय, रोहिदास शेलार-स्वीय सहाय्यक आमदार दौलतजी दरोडा, विजय औसरकर, गणेश पाटील-ओ.बी.सी सेल तालुकाध्यक्ष, विराज पाटील-विक्रमगड विधानसभा युवक अध्यक्ष, हेमंत पाटील-जिल्हा प्रसिद्धी प्रमुख,रघुनाथ माळी-पं स सदस्य, डॉ माधुरी कांबळे- गायकवाड -स्त्रीरोग तज्ज्ञ, रोहिणी शेलार- जि.प सदस्य,अक्षता चौधरी-जि. प. सदस्य, पुनम पथवा-पं.स. सदस्य, सुचिता पाटील-बांधकाम सभापती न.पं.वाडा, अश्विनी भोईर- वाडा शहराध्यक्षा, वंदना कलिंगडा, ज्योत्स्ना सांबरे तसेच सर्व सेल चे पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमास नंदकुमार आंबवणे, वाडा तालुका आरोग्य अधिकारी, कर्मचारी, ग्रामीण रुग्णालय वाडा, द्रोण हॉस्पिटल वाडा स्टाफ, आशा वर्कर्स, गट प्रवर्तक आदींचे मोलाचे सहकार्य लाभले.

लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या पथकाची कामगिरी

# चोरीच्या ४ मोटरसायकलीसह १ लाख ९३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरातील शिवाजीनगर पोलीस, एमआयडीसी व विवेकानंद चौक पोलिस ठाणे हद्दीत घडलेल्या वेगवेगळ्या गुन्ह्यातील फरार आरोपींना अटक करत लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या विशेष पथकाने उत्कृष्ट कामगिरी कामगिरी केली आहे. या कारवाईत ९ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ५ मोटरसायकली १ मोबाईल असा १ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणाहून मोटरसायकली चोरी गेल्याच्या घटना घडल्या होत्या. या मोटरसायकलींचा तपास सुरू असतानाच लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलिस अधिक्षक हिमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विविध गुन्ह्यांची उकल करणयासाठी पोलिसांचे एक पथक तयार केले. या पथकात सहायक फौजदार वाहिद शेख, पोकॉ.रामचंद्र ढगे, माधव बिलापटे, अभिमन्यू सोनटक्के सोमनाथ खडके यांचा समावेश करण्यात आला. या पथकातील पोलिसांनी एका गुप्त माहितीआधारे एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत चोरीस गेलेल्या मोटरसायकली चोरणारे संशयीत आरोपी हे पुणे येथे असल्याची गुप्त माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून या पोलिस पथकाने सापळा लावून हनुमंत धोंडीराम मोरे (वय २३ वर्ष राहणार उटी ता. औसा, जि. लातूर, हल्ली मुक्काम दौंड पुण) तसेच धनंजय परमेश्वर धुमाळ (वय २०) यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता त्यांनी चार मोटरसायकली चोरी केल्याचे कबूल केले याप्रकरणी पोलिसांनी चोरीस गेलेल्या चार मोटारसायकली जप्त केल्या ज्याची किंमत १ लाख ६० हजार रुपये आहे. तसेच शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील ट्युशन एरियामध्ये एका विद्यार्थिनीचा मोबाईल हिसकावून नेल्याची घटना घडली होती. या घटनेतील संशयित आरोपी किरण मारुती मळेकर तसेच सागर उर्फ पिल्लू भगवान सोनवणे हे शहरातील पटेल नगर येथे आसल्यरची गुप्त माहीती मिळाली. यावरून या पोलिस पथकाने पटेल नगर भागात सापळा लावून या दोन संशयीत आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी ट्युशन एरीयातून एक मोबाईल हिसकाल्याची कबुली दिली. सदरील आरोपींनी चोरी केलेला मोबाईल व गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल पोलिसांनी जपत केली. तसेच विवेकानंद पोलीस ठाणे हद्दीत बेकायदा शस्त्र बाळगणे, धमकावणे, गंभीर दुखापत करून दहशत पसरविणे अशा विविध गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध घेत आरोपी योगेश उर्फ शक्ती अशोक गुरणे, इस्माईल उर्फ बाबा जलील शेख, आकाश सुरेश सकट, राहुल नागनाथ तांबरे व सागर उद्धव कांबळे राहणार सर्व माताजी नगर यांना अटक करत उत्कृष्ट कामगिरी केली.

# गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे भुईमूग लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण



**जळगाव/प्रतिनिधी**

येथील गांधी फाऊंडेशन आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ मुंगफली अनुसंधान निदेशालय जुनागढ निर्मीत तेलबीया संशोधन केंद्र, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भुईमुग लागवड तंत्रज्ञान संबंधी मार्गदर्शन प्रशिक्षण चोपडा तालुक्यात सातपुडा दुर्गम भागातील गौऱ्यापाडा येथे पार पडले. तसेच यावेळी आदिवासी उपयोजना (TSP) कृषी निवीष्ठा वाटप ही करण्यात आले. आरंभी गावातील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत म्हटले. भूईमूग लागवड तंत्रज्ञान बाबत प्रशिक्षण कार्यक्रमात प्रामुख्याने तेलबियांची ओळख करून देण्यात आली. आपल्या दैनंदिनजीवनात तेलाचे महत्व अनन्य साधारण आहे. तेलाचा वापर खाण्यासाठी, औषधासाठी, इंधनासाठी व सौंदर्यप्रसधनासाठी केला जातो. त्यामुळे बाजारात त्याची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. आपल्याकडे प्रामुख्याने भुईमुग, तीळ, सूर्यफुल, सोयाबीन व करडई हे तेलबिया पिके घेतले जातात. परंतु सातपुड्याचे वैशिष्ट असे की, येथील आदिवासी शेतकरी बांधव मोहाचे वृक्ष देखील मोठ्या प्रमाणात लागवड करतात. मोहाच्या बियांपासुन तेल निर्मिती केली जाते. त्यामुळे तेलबिया उत्पादनाला स्थानिक उद्योगाच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास त्या भागात तेलघाना उद्योग सुरु होऊन शेतकऱ्यांना जास्त उत्पादन मिळु शकते. याबाबत योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळावे याकरिता गांधी रिसर्च फाऊंडेशन आणि तेलबिया संशोधन केंद्र आपल्या सोबत आहे असे प्रतिपादन डॉ. सुदाम पाटील यांनी यावेळी केले. प्रशिक्षणात सहभागी ५० शेतकऱ्यांना मोफत फवारणी यंत्राचे प्रा. ए.ए.शेख आणि गांधी रिसर्च फाऊंडेशनचे सुधीर पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. गिरीश चौधरी आणि डॉ. एस.एस. नवले यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गांधी रिसर्च फाऊंडेशनचे स्वयंसेवक सागर चौधरी, चंद्रकांत चौधरी, प्रशांत सुर्यवंशी, विक्रम अस्वार, माजी पंचायत समिती सभापती टेमऱ्या पावरा, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश पावरा, गीताबाई पावरा व ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर चौधरी, सूत्रसंचालन दिनेश पाटील तर आभार प्रदर्शन चंद्रकांत चौधरी यांनी मानले.

# रश्मी शेटकर पदवी परिक्षेत अमेरिकेत प्रथम



**लातूर/प्रतिनिधी**

नॅशवेल(टेनिसी स्टेट-यूएस)-अमेरिकेतील टेनिसी स्टेट मधील नेशविल या शहरात वास्तव्यास असलेले सॉफ्टवेअर इंजिनियर रवी शेटकर व त्यांच्या सुविध पत्नी सौ. नैना शेटकर यांची कन्या रश्मी शिवशंकर बिरादार (शेटकर) यांनी पदवी परिक्षेत संपूर्ण अमेरिकेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. बिजीनेस मॅनेजमेन्ट अंतर्गत हेल्थ केअर मॅनेजमेन्टच्या पदवी परिक्षेत सर्व विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून पूर्ण अमेरिकेत प्रथम आल्याचे स्ट्रेयर युनिवर्सिटी मार्फत मेलद्वारे कळवले आहे. रश्मी-शेटकर(बिरादार) पूर्ण देशात प्रथम आल्याबद्दल स्ट्रेयर विद्यापिठाचे चॅन्सेलर यांनी रश्मी शेटकर यांचे अभिनंदन केले आहे. विद्यापीठ आणि त्यांच्या महाविद्यालयामधील प्राचार्य प्राध्यापक व इतर संबंधितांनी अभिनंदन केले आहे. लातूर येथील दैनिक 'यशवंत'चे संस्थापक प्रा. ऍड. बी.व्ही. मोतीपवळे यांची रश्मी शेटकर ही नात असून शंभूउमरगा ता. उदगीर येथील चेअरमन विजयकुमार बिरादार यांची स्नुषा आहे. सौ. रश्मी शेटकर रवी व नैना शेटकर हे सर्व अमेरिकेचे नागरीक आहेत. रश्मी शेटकर (बिरादार) यांचे भारतातील विशेषतः लातूर जिल्ह्यातील सर्व नातेवाईक शिक्षक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

पान १ वरून....

## तहसील कार्यालयातील बाबूंची मुजोरी...

म्हणून आपल्या दलालाच्या मदतीने त्या पिडीत महिलेला पुण्याला पाठवून दिले, तर तिच्या भावाला धमकी दिल्याने तो बिचारा तीन दिवस पळून गेला होता. शासनाचा दंडाधिकारी म्हणून न्यायधीश प्रमाणेच पावर असलेल्या तहसीलदारांच्या समोर आत्महत्याग्रस्त शेतमजुराच्या पत्नीला आणि तिच्या भावाला मारहाण होणे आणि तहसिलदार या प्रकरणी कोणतीही कारवाई न करणे हि अत्यंत गंभीर बाब असून या प्रकरणी लोकांमध्ये संतापाची लाट उसळली असून लोकं आता तहसीलदारांच्या बदलीची तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून पिडीत बहिण भावाला मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करीत आहेत.

बोरोल येथे राहणारे शेतमजूर संजीव डब्बे यांच्यावर खाजगी सावकाराचे दीड लाख रुपयांचे कर्ज होते. या कर्जाला कंटाळून त्यांनी चार महिन्यापूर्वी आत्महत्या केली. दरम्यान त्यांच्या आत्महत्येशी संबंधित असलेली काही कागदपत्रे प्राप्त करून घेण्यासाठी संजीव डब्बे यांची पत्नी लता डब्बे आणि तिचा भाऊ आतिश शृंगारे हि दोघे १७ फेब्रुवारी २०२१ रोजी देवणी तहसील कार्यालयात गेली होती. मात्र त्या ठिकाणी त्यांना कोणतीही कागदपत्रे देण्यात आली नाहीत. पोलिसांकडून आमच्याकडे पेपर आले नाहीत. तुम्ही कागदपत्रांसाठी तसा अर्ज केला नाही असे सांगून त्यांना तेथून हाकलण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्यावर त्यांनी तिथल्या अधिकाऱ्यांना विनंती करण्याचा प्रयत्न केला असता लताला तिथल्या कर्मचाऱ्यांनी धक्काबुक्की केली. तर तिच्या भावाला मारहाण करून बाहेर काढले हा सगळा प्रकार तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या समोर घडला. पण त्यांनी कोणत्याही प्रकारे मध्यस्थी केली नाही किंवा लता व तिचा भाऊ आतिश यांना मारहाण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोखले नाही. एका पिडीत महिलेला पुरुष कर्मचारी धक्काबुक्की करीत होते. हा प्रकारच भयानक होता आणि याला अर्थातच हे सगळ निमुटपणे पाहणारे तहसीलदार जबाबदार आहेत असा आरोप आतिश शृंगारे यांनी केलाय. तर तहसील कार्यालयात येणाऱ्या गोरगरीब शेतकरी आणि शेतमजूर यांना यापूर्वीही अशीच मारहाण झाल्याच्या घटना घडलेल्या असल्याने इथे यायला लोक घाबरतात असा आरोप स्थानिकांनी केला आहे हे तहसील कार्यालय आहे कि माफियांचा अड्डा असा प्रश्नही लोकं विचारीत आहेत. म्हणूनच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून लता व आशिष या गरीब बहिण भावाला मारहाण करणाऱ्या तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना निलंबित करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच अशा घटनांना तहसीलदाराच प्रोसाहन देत असावे म्हणून इथल्या कर्मचाऱ्यांची मुजोरी वाढलीय असा आरोप करून या प्रकरणी तहसीलदारांची चौकशी करावी अशी मागणी केली जात आहे.

दरम्यान लातुर जिल्ह्यातील कोणत्याही तहसील कार्यालयात संगायो व इंगायो या योजनेतील निराधार व्यक्तीस हायाताचे प्रमाणपत्र लाभार्थी हे स्वतः हजर राहुन घेतले जात नाही. परंतु देवणी तहसील अपवाद असून येथे वरील योजनेतील जेष्ठ नागरिक, असाह्य अपंग, आजारी, विधवा लाभार्थ्यांना सुद्धा देवणी तहसील कार्यालयात स्वतः लाभार्थी हजर होऊन यातीचे स्वंयघोषणा प्रमाणपत्र दिले. तरच लाभार्थ्यांना लाभ (मानधन) दिला जाईल अन्यथा पगार (मानधन) बंद केली जाईल अशा आदेशाची फतवा देवणी तहसीलदार यांनी काढुन लाभार्थ्यांस वेठीस धरण्याचे प्रकार चालू आहे. यापुर्वी हायाता बाबत तलाठी व ग्रामसेवक यांच्या मार्फत अहवाल मागविले जात होते हि पद्धत तहसीलदारांनी बंद केली आहे. याबाबत सुत्रांकडुन मिळालेल्या माहिती नुसार सदरील लाभार्थ्यांस तहसील कार्यालयात स्वतः समक्ष स्वंयघोषणा प्रमाणपत्र देण्याऐवजी याबाबतचे तालुक्यातील सर्व गावात जाऊन तलाठी व मंडळअधिकारी यांच्या मार्फत हायाताचा अहवाल मागवुन घेण्याचा आदेश वरिष्ठानी दिले आहे. पण स्वतः तहसीलदार याबाबत कोवीड १९ या वाढत्या संसर्गामुळे, सध्या आठ दिवस स्थगीत केले असल्याचे तहसील कार्यालयात चर्चा आहे. हायाताचे स्वंयघोषणा प्रमाणपत्र देण्याचे दोन वेगवेगळे मतप्रवाहामुळे तालुक्यातील जनतेमध्ये उलट सुलट चर्चेला उधाण फुटले आहे.

## जमिनीच्या वादातून दारुडा मुलगा ...

या घटनेनंतर पोलीसांनी तपास करून संशयीत मुलाला आणि त्याच्या दोन्ही मित्रांना ताब्यात घेतले. दरजाई ता.खटाव येथे संपत सत्रे हे आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत. गावातच त्यांची ५ एकर शेती असून त्या शेतीच्या उत्पन्नावरच त्याच्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह होत होता. ते आपल्या शेतात रात्रीचा दिवस करून घाम घाळीत होते. त्याचा मुलगा पवन हा त्याच्यापासून विभक्त राहत होता. गेल्या काही वर्षापासून तो आपल्या मित्राच्या संगतीने दारू पिण्याच्या नादाला लागलेला होता. दारू पिण्याच्या व्यसनात तो इतका वाया गेलेला होता. त्याचे त्याच्या संसाराकडे लक्ष नव्हते.त्यातच त्याने गावातील खाजगी सावकाराकडून बरीच रक्कम व्याजाने घेतलेली होती. त्यात तो कर्जबाजारी झालेला होता. मिळेल त्यावेळी काम करायचे इतर वेळी नको तो उपद्याप करीत फिरायचे असा त्याचा दिनक्रम ठरलेला होता. गावातील लोकांनी ही त्याच्या घरची परिस्थीत चांगली आहे. गावात घर आणि शेती आहे म्हणून त्याला तो मागेल तसे पैसे दिलेले होते. ती रक्कम ही मोठी होती.पवन हा वडिलार्जीत घरातच विभक्त राहत असल्याने त्याचा त्रास वडिल संपत यांना होत होता. तो दारू पिऊन आला की घरात त्याच्याबरोबर भांडणे काढत होता. त्या भांडणात तो त्यांना मारायला ही जात असतो. दिवसागणीक त्यांची भांडणे वाढलेली होती. त्याच्या भांडणाला त्याचे शेजारी ही वैतागलेले होते. बऱ्याचवेळेला त्यांची भांडणे शेजाऱ्यांनी मिटवलेली होती. पवन हा दारू पिऊन येऊन वडिलांना मी कर्जबाजारी झालो आहे. माझ्यामागे सावकार लोकांनी कर्जाऊ घेतलेले पैसे देण्याचा तगादा लावलेला आहे. ते मला धमकी देत आहेत मला यातून सोडवा असे तो त्यांना सांगत होता. पण तो दारूच्या इतक्या आहारी गेलेला होता की तो काही ही आणि कोणताही कामधंदा करीत नसल्याने त्याला कशी मदत करायची या विचारात वडिल संपत सत्रे हे होते. परंतू पवनाचा त्याच्या मागचा तगादा काही सुटत नव्हता. तो दारू पिऊन आला की त्याच्याबरोबर भांडणे काढून आपली ५ एकर शेती आहे त्यातील काही एकर शेती विकूया त्यातून आलेल्या पैशातून मी माझे कर्ज भागवितो त्यासाठी शेती विका अशी गळ तो आपल्या वडिलांना घालीत होता. शेती विकून मुलाचे कर्ज फेडणे हे संपत सत्रे यांना पटत नव्हते. त्या शेतीवरच त्याचा उदरनिर्वाह हा होत होता. एकदा शेती गेली की मग पुढे कसे होणार. म्हातारपणी आपल्याला शेती शिवाय कोणताच आणि कसलाच आधार नाही. त्यामुळे ते शेती विकण्यास विरोध करीत होते. त्यापेक्षा तू बाहेर कुठे तरी चांगले काम कर. दारू पिण्याचे बंद कर. कामातून आलेल्या पैशातून थोडे थोडे आपण तुझे कर्ज फेडूया असे ते पवनला सांगत होते. पण हे पवनला पटत नव्हते. तो त्याच्या मागे शेती विकण्याचा तगादा लावीत होता. शेती विकूनच माझे कर्ज फिटेल. असे तो त्यांना सांगत होता. त्यासाठी बाप मुलात दररोज भांडणे होत होती. वडिल तर शेती विकयाला तयार नाहीत आणि आपल्या मागचा सावकर लोकांचा तगादा काही सुटत नाही अशा दुहेरी कात्रीत पवन सापडला होता. त्याला काय करावे हे सुचत नव्हते. एकदा तो दारू पिण्यासाठी आपल्या मित्र सौरभ अशोक कदम आणि युवराज मोहन जाधव यांच्याबरोबर बसला असताना त्याने आपल्या मित्रांना आपली अडचण सांगितली. त्यावर त्या तिघांनी विचार करीत त्यावर, एक उपाय शोधून काढला होता. वडिलांच्या माघारी त्या शेतीचा आणि घराचा मालक हा पवनच होता. त्याचे वडिल सांगूनही ऐकत नव्हते. मग वडिलांनाच आपल्या मार्गातून बाजुला काढल्यावर आपण आपले कर्ज आणि सावकरांची देणी आरामात भागवू शकतो हे पवनने पवनने सौरभला आणि युवराजला सांगितले. आता पवनच्या मार्गातून त्याचे वडिल संपत सत्रे याना बाजूला करायचे म्हणजे त्यांना जीवेच मारावे लागेल तरच पवनचा मार्ग सुकर होऊ शकतो या विचारापर्यत ते तिघे ही आले होते.दारूच्या नशेत पवनच्या वडिलाचा काटा काढायचा मात्र त्यात आपण अडकायचे नाही असा प्लॅन त्या तिघांनी रचला. वडिल शेतातून घरी येत असताना त्याच्या कानजवळ लाकडी दांडक्याने कुणी तरी मारहाण केली त्या मारहाणीत त्याच्या मानेवर लाकडी दांडके बसल्यावर ते पाय घसरून खाली पडले आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला असे भासविण्याचे ठरले. पवनच्या मैत्री खातर ते दोघे त्याला मदत करायला तयार झाले होते. खरे तर या घटनेत त्या दोघांचा काहीच फायदा नव्हता. मैत्री खातीर पवनला मदत करायची असे त्या दोघांनी ठरवले होते. त्यावेळी दारूच्या नशेत केलेल्या प्लॅनिगवर चर्चा करणेसाठी परत, एकदा त्यांनी दारूची पार्टी केली. त्यावर त्याची गेम कधी आणि कशी करायची यावर शिक्कामोतर्ब करण्यात आले.

बुधवार दि.१७ फेब्रुवारी २०२१ रोजी रात्री ७.३०च्या दरम्यान संपत सत्रे हे आपल्या शेतातून काम संपवून घरी येत होते. त्यावेळी पायवाटेवर बराच अंधार पसरलेला होता.त्या पायवाटेवरती पवन त्याचे मित्र सौरभ आणि युवराज हे अंधारात एका निर्जन स्थळी दबा धरून बसले होते. रात्रीच्या अंधारात संपत हे घरी येत असताना त्या पायवाटेवर लपून बसलेले पवन त्याचे मित्र सौरभ आणि युवराज यांनी अंधाराचा फायदा घेऊन संपत याच्यावर ठरल्या प्रमाणे लाकडी दांडक्याने मारहाण करायला सुरूवात केली. मारहाण करीत असताना ते लाकडी दांडके त्याच्या कानावर मारण्याऐवजी त्यांनी ते दांडके मानेवर मारले. त्यासरशी संपत सत्रे हे जागेवरच ओरडत तडफडत खाली पडले. तरीही त्याच लाकडी दांडक्याने ते तिघे त्यांना मारहाण करीत होते. त्या अंधारात त्याना मारेकरी कोण आहेत? आणि ते आपल्यला का मारहाण करीत आहेत हे त्यांना माहित नसल्याने ते ओरडत का रे बाबानो तुम्ही मला उगीच का मारता मी काय तुमचे घोडे मारले आहे? असे म्हणत होते. लाकडी दांडक्याचा मार त्याच्या डोक्यालाही बसल्याने त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला होता. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला होता. यानंतर त्यांनी त्याचा पाय घसरून पडून मृत्यू झाल्याचे भासविण्यासाठी त्याच्या डोक्याखाली दगड ठेवला आणि या घटनेनंतर पवनसह त्याचे दोन्ही मित्र अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या पायवाटेवरून जाणाऱ्या लोकांना संपत सत्रे याचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह दिसून आला. त्यांनी या घटनेची माहिती खटाव पोलीसांना देवून संपतच्या घरच्या लोकांना ही दिली. त्यावेळी घटनास्थळी पवन येऊन मोठ मोठयाने रडण्याचे नाटक करीत होता. त्याचवेळी पोलीस ही तेथे आले.त्यांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीस मयत संपत याचा मुलगा पवन याच्या कडून घेत असताना तो पोलीसांना विसंगत उत्तरे देत होता. तो पोलीसांना काही माहिती खोटेच सांगत असल्याचे त्याच्या जबानीतून पोलीसांन समजत होते.पोलीसांनी त्याच्याकडून जुजबी माहिती घेतली होती.मात्र संपत सत्र याचा खून कुणी आणि कशासाठी करेल याचे कोडे पडले होते.कारण संपत सत्रे याचे कुणाशी कसलेच वैर नव्हते.की भाऊबंदकी नव्हती. आणि कुणाशी आर्थिक वाद ही नव्हता. दुसऱ्या दिवशी पर्यत पोलीस मारेकऱ्यापर्यत पोहचू शकले नव्हते. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वषेशनचे पोलीस ही करीत होते. पोलीस निरी.किशोर धुमाळ यांनी या गुन्हायचा छडा लावून आरोपीना जेरबंद करण्याचे आदेश पोलीसांना दिले या घटनेतील संशयीत आरोपीचा शोध घेणेसाठी पोलीसांनी आपल्या गुप्त बातमीदारांना ही कामाला लावले होते. त्यांनी दिलेल्या माहितीवरून मयत संपत संत्रे याचा मुलगा हा व्यसनाधीन असून तो कर्जबाजारी असल्याने बाप आणि मुलगा याचेत दररोज भांडणे होत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्यानुसार पोलीसांची संशयाची सुई पवनकडे वळाली होती.पोलीसांनी त्याला संशयावरून ताब्यात घेऊन त्याच्यकडे या घटनेची चौकशी करयाला सुरूवात केली असता तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता.पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखवताच तो पोपटासारखा बोलू लागला. त्याने आपल्या वडिलांचा खून कोणत्या कारणातून केला याची माहिती पोलीसांना दिली.त्याच प्रमाणे त्यासाठी आपल्या मित्रांची ही मदत घेतल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. पोलीसांनी या घटनेतील दुसरे संशयीत आरोपी सौरभ कदम आणि युवराज जाधव यांना ही खटावमधून अटक करून ताब्यात घेतले होते. त्या दोघांनी गुन्हयाची कबुली दिली. पोलीसांनी संपत गुलाब सत्रे (वय ५५) याच्या खून प्रकरणी त्याचा मुलगा पवन संपत सत्रे (वय २८) त्याचे मित्र सौरभ अशोक कदम (वय २३) आणि युवराज मोहन जाधव (वय ३५) रा.दोघेही वडुज ता.खटाव याच्या विरोधात खटाव पोलीस ठाण्यात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्या कडून गुन्हयात वापरलेली लाकडी दांडका जप्त केला होता.या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल,अप्पर पोलीस अधिक्षक श्रीरज पाटील व कोरेगाव उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश किंद्रे पुसेगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरी. विश्वजीत घोडके स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीस .निरी. किशोर धुमाळ, सहायक पोलीस निरी आनंदसिंग साबळे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उत्रप.निरी. लोढे-पाटील,सहायक फो.तानाजी माने, पोहवा.सुधीर बनकर, पो.ना.अर्जुन शिरतोडे, पो.कॉ.मयुर देशमुख, संकेत निकम, संजय जाधव, सहायक फौजदार आनंदराव जगताप, पो.हवा.चंद्रहार खाडे, सचिन खाडे, आनंदराव गमरे, पुष्कर जाधव, सचिन जगताप, सचिन माने, गणेश मुंडे, इम्तियाज मुल्ला यांनी करून यातील संशयीत तीन्ही आरोपीना कोणताही पुरावा नसताना योग्य रित्या तपास करून ताब्यात घेतले होते. वडिलार्जीत शेतीत खरे तर मुलाचा वारसा हक्क असतो. पण तोच मुलगा जर व्यसनाधीन आणि कर्जबाजारी झाला असेल तर वडिल आपल्या हक्काची दमही ही त्याला देवू इच्छित नाहीत. त्यातूनच त्याचे भांडण हे ठरलेले असते. वाह्यात गेलेला मुलगा मग चिडला जातो आणि मग त्याच्याहातून खूनाची घटना घडते हेच यातून दिसून येते.

## सूनबाईच्या हातून भलतेच घडून...

घटनास्थळहून नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. आज सकाळीच सासू गाढ झोपेत असल्याच्या फायदा सुनेने घेतला आहे. सुनेने घरातील वरवंटाच सासूच्या डोक्यात टाकले, यांत या घटनेतील सासू जबर जखमी होवुन तिचा म्रृत्यु झाला आहे. त्यामुळे परीसरात या घटनेने प्रंचड खळबळ माजली आहे. बेकरे गावातील राहणारे मयत तारामती कराळे हे पहाटे घरी झोपेत होते तर पती पांडुरंग कराळे लवकर उठून गावात गणपती उत्सव असल्याने घरा बाहेर पडले होते. पांडुरंग कराळे हे घरी परतल्यावर सहा वाजण्याच्या सुमारास पत्नीला उठवण्यासाठी गेले असता पत्नी उठत नसल्याने ही घटना उघडकीस आल्याचे समजते आहे. तारामती यांच्या डोक्यात जबर मार बसल्याचे दिसुन आले असून डोक्यातुन रक्तस्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. दरम्यान या घटनेनंतर घरातील सून (योगिता कराळे) कुठेच दिसून येत नसल्याने तिचा शोध घेण्यात आला. मात्र येगिता (सून) घराशेजारीच असणाऱ्या जागेत लादी पुसण्यासाठी वापरला जाणारा द्रव पदार्थ पिलेल्या अवस्थेत तेथेच मिळून आली आहे. त्यामुळे सासुच्या हत्येचा घटने बाबत नेरळ पोलिसांनी सूनेला ताब्यात घेतले आहे. मात्र ही हत्या नक्की कोणत्या कारणाने करण्यात आली आहे, याचे नेमके कारण समजू शकले नसल्याने नेरळ पोलीस या घटनेचा अधिक तपास घेत आहेत. या घटनेतील सुन योगिता हिस एक मुलगा व एक मुलगी असून पती योगेश कराळे यांचा तींनवर्षा पूर्वी म्रृत्यु झाला आहे. तर या अगोदर देखील योगीताने दिराच्या मुलाला काठीने मारायचा प्रयन्त केला असल्याचं समजत आहे. त्यामुळे या घटनेने नेरळ पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नेरळ पोलिस ठाणेत करण्यात आली असून अधिक तपास कर्जतचे उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेरळ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नारनवरे व नेरळ पोलिस करीत आहेत.

## शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत दुचाकी जळून राख



वाडा : वाडा तालुक्यातील न्यायालयाच्या आवारात शनिवारी सकाळच्या सुमारास एका दुचाकीने पेट घेतला असून या आगीत ती जाळून राख झाली आहे. कार्यालयातील कर्मचारी शहापूर येथून कामाला येत असून नेहमी प्रमाणे तो आजही कामावर हजार होता मात्र शहापूरहुन आल्याने ही गाडी गरम झाली असावी व यातील बॅटरीच्या वायरमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यामुळे ही लाग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांनी आगीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला मात्र तो पर्यंत दुचाकी जाळून राख झाली होती.

पान ८ वरून....

## मनोर - वाडा - भिवंडी रोडसह...

वाडा तालुक्यातील डाकीवली - केलठण - गातेस - खानिवली, देसई - तीलसा - कलंभे, खैरे - कोंढले, कंचाड - खानीवली या प्रमुख अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. तर वाडा - भिवंडी या तालुक्यातून जाणाऱ्या रस्त्यावर तर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असूनही या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम विलंबाने होत आहे. तसेच वाडा - मनोर या रस्त्यावर खड्डे भरण्यात आले असेल तरी या रस्त्यावर साईड भराव झाला नसल्याने अनेक अपघात घडले आहेत. या सर्व रस्त्यांची प्राधान्याने दुरुस्ती होणे आवश्यकता असताना याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने जनतेत संतापाचे वातावरण पसरले आहे.

## दुरवस्था झालेल्या विरार तलाठी ...

एखादी दुर्घटना घडली तर जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. या कार्यालयामार्फत प्रशासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असतानासुद्धा कार्यालय दुरुस्ती का होत नाही याबाबत नागरिक साशंक असून त्यांनी महसूल खात्याकडे तशी तक्रारही केली होती. परंतु परिस्थिती अद्याप जैसे थे आहे. दरवर्षी पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होते. छपरातून पाणी गळती होत असल्याने कार्यालयातील महत्त्वाचे दस्तऐवज, शासकीय कागदपत्रे जपून ठेवण्यासाठी कर्मचारी, शिपाई वर्ग यांना ताडपत्रीचा आधार घेऊन तारेवरची कसरत करावी लागत आहे. संबंधित तलाठी कार्यालयाची दुरवस्था प्रत्यक्ष पाहिल्यानंतर वसई-विरार जिल्हा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष कुलदीप वर्तक यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री नामदार बाळासाहेब थोरात यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीची महसूलमंत्र्यांनी तातडीने दखल घेऊन महसूल विभागाच्या उपसचिवांना ताबडतोब कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे अनेक वर्षापासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या या कार्यालयाचा कायापालट होण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

## देवणी येथे शिवजयंतीनिमित्त ध्वजारोहण ...

सचिन कडगे, बापूसाहेब कोतवाल, महेश मुळे, रोहित बंडगर, सिद्धेश्वर पाटील आदी उपस्थित होते. येथील भारत जोडो मित्रमंडळातर्फे शिवजयंती निमित्त ध्वजवंदन व अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी देवणी येथील वीरशैव मठाचे मठाधिपती सिद्धलिंग महाराज,पंचायत समिती सभापती शंकरराव पाटील, रमेश बिरादार, स्वप्निल बावगे, लक्ष्मण गिरि, राहुल शिंदे, सोमेश्वर कापडे, बालाजी तंबाके आदी उपस्थित होते.

## रक्तदान राष्ट्रीय कार्यात सहभाग घेऊन ...

निर्मलग्राम अभियान असे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवून आपल्या गावचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. गावात नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत विधायक काम करणाऱ्या युवकांना ग्रामस्थांनी संधी दिली आहे,यामुळे भविष्यात यापेक्षा आणखी चांगले उपक्रम गावात राबविले जातील अशी माहिती युवकांनी दिली आहे. रक्तदान शिबीरातील रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन आणि भगवा फेटा घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजनासाठी श्रीमंतराजे प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विशाल पाटील, उपाध्यक्ष इश्वर शिंदे, जयप्रकाश वाचनालयाचे ग्रंथपाल नंदकूमार देशपांडे, अजयकुमार बीर्ले, संतोष मुरूमकर, सावन मरे आदींनी परिश्रम घेतले.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांचे कार्यालय**

**पत्ता : सूर्या प्रकल्प वसाहत, मनोर ता.जि. पालघर ४०१४०३**

ई-मेल पत्ता : eepidpalghar@gmail.com /दुरध्वनी क्रमांक : +९१ ८००७३३५३७३

कार्यकारी अभियंता पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांच्या कार्यालय अंतर्गत सिंचन शाखा क्रमांक १, कवडास या कार्यालयांतर्गत खालील दर्शवल्याप्रमाणे निरुपयोगी लोखंडी साहित्य व इतर साहित्य विक्री करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागवण्यात येत आहेत.

| बाब क्रमांक | कामाचे वर्णन | दर प्रती टन |
|---|---|---|
| | सूर्या प्रकल्पांतर्गत पाटबंधारे बांधकाम विभाग मनोर या कार्यालयांतर्गत कवडास उन्नेवी बंधारा कार्यक्षेत्रावरील जीर्ण झालेले पत्र्याचे शेड पडणे व शेड पाडल्यानंतर त्यामधून निघणाऱ्या साहित्याचे खरेदीचे दर | |
| १. | लोखंडी साहित्य | रु.... प्रती टन |
| २. | सिमेंट पत्रे | रु.... प्रती टन |
| ३. | विटा | रु.... प्रती टन |
| ४. | लोखंडी खिडक्या | रु.... प्रती टन |

१. वरील अनुषंगिक दरपत्रके दिनांक १९/०२/२०२१ ते ०१/०३/२०२१ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवस व वेळेत नामांकित पेढी/अधिकृत व्यावसायिक/शासकीय नोंदणीकृत व्यावसायिक ई कडून मागणी करण्यात येत आहे. संबंधित कामाचे नाव मोहरबंद लिफाफ्यावर ठळक अक्षरात लिहलेली परिपूर्ण मोहरबंद दरपत्रक दिनांक ०१/०३/२०२१ रोजी १४.०० वाजेपर्यत या कार्यालयात पोहोच होणे आवश्यक आहे. विहित दिनांक व वेळेपर्यत प्राप्त झालेली मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास दिनांक ०१/०३/२०२१ रोजी १५.०० वाजता उपस्थित व्यावसायिक/ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
२. व्यावसायिकांनी त्यांचे व्यवसाय नोंदणी पत्र मूल्यवर्धित कर, प्राप्ती कर यांचे नोंदणीपत्र दरपत्रकासोबत सदर करणे आवश्यक आहे.
३. सर्वात जास्त दर नोंदवणाऱ्या खरीदीदारास दर मंजुरीचे आदेश दिले जातील. हे दर फक्त वरील कामांसाठी असतील.
४. कार्यक्षेत्रावर शेड पडण्यासाठी व लोखंडी साहित्य कापण्यासाठी येणारा खर्च अभिकरणास करावा लागेल.
५. शासनाचा प्रतिनिधी कार्यक्षेत्रावर उपस्थित असल्याशिवाय साहित्य वाहनामध्ये भरता येणार नाही.
६. भंगार साहित्याची वाहतूक वाहनात भरलेल्या अंदाजे वजनानुसार मुल्यवर्धक करासह रकमेचा भरणा अगोदर करावा लागेल. तसेच वजन केल्यानंतर जास्तीची रक्कम भरावी लागणार असल्यास ती भरणा केल्यानंतरच वाहतुकीचा परवाना देण्यात येईल.
७. साहित्याच्या एकूण रकमेवर १८% अधिक मूल्यवर्धित कराची आकारणी करण्यात येईल.
८. वरील साहित्य उचलताना इतर शासकीय मालमत्तेस हानी होणार नाही याची दक्षता व्यावसायिकांना घ्यावी लागेल.
९. कोणतेही कारण न देता दर पत्रक किंवा सर्व दरपत्रके स्वीकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे.

जा.क्र. पापावि/भाशां/६४०/सन २०२१ दि. १७/०२/२०२१
कार्यकारी अभियंता पालघर पाटबंधारे विभाग, मनोर याचे कार्यालय
सुर्या प्रकल्प वसाहत मनोर ता. जि. पालघर

**सही/-**
**(र. भा. पवार)**
**कार्यकारी अभियंता**
**पालघर पाटबंधारे विभाग मनोर**

**जिमाका/पालघर/जाहि ५३/८८/२०२१ दिनांक : १७/०२/२०२१**

22 TO 28 FEB 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 20/02/2021 9:27 PM Page 1



### वन विभाग व सह्याद्री गिरिभ्रमणचा पुढाकार, पुरातत्त्व विभागाचे सहकार्य

# शिवनेरी किल्ल्यावर जैन ठिबकवर फुलणार देवराई



**जळगाव/प्रतिनिधी**

छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर वन विभागाच्या वतीने देवराई साकारण्यात येत आहे. यासाठी जैन उद्योग समूहाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत (सीएसआर) कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात सामाजिक दायित्वातून पहिल्या टप्प्यात सुमारे २१ लाखांची ठिबक सामग्री बसविण्यात येणार आहे. हा प्रकल्प जुन्नरच्या सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेच्या पुढाकाराने आणि पुरातत्त्व विभागाचे सहकार्याने राबविला जाणार असल्याची माहिती जुन्नर वन विभागाचे उपवनसंरक्षक जयरामे गौडा यांनी दिली.

याबाबत गौडा म्हणाले,शिवनेरी किल्ल्याच्या संवर्धन आणि विकास प्रकल्पा अंतर्गत किल्ल्यावरील जैवविविधता संवर्धनासाठी वृक्षारोपण करण्यात येते. मात्र ऐन उन्हाळ्यातील चार महिने पाण्याची टंचाई जाणवू लागल्यानंतर झाडांना पाणी देणे अडचणीचे होते. हि अडचण दूर व्हावी यासाठी जुन्नरच्या सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेच्या पुढाकाराने जैन उद्योग समूहाला शिवनेरी किल्ल्यासाठी ठिबक सिंचन यंत्रणा देण्याबाबत विनंती केली होती. या विनंतीला जैन समुहाचे सह व्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यानंतर जैन समूहाचे तांत्रिक अधिकारी, पुरातत्त्व विभागाचे संरक्षक सहाय्यक बी.बी.जंगले, वन परिक्षेत्र अधिकारी अजित शिंदे आणि सह्याद्रीचे पदाधिकारी यांनी किल्ल्याची संयुक्त पाहणी करून अहवाल सादर केला. या अहवालानुसार अंबरखाना इमारतीच्या मागील वनक्षेत्रावर सुमारे २५ एकर क्षेत्रावर देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यासाठीच्या सिंचनाची सुविधा जैन उद्योग समूहाच्या वतीने केली जाणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी जैन इरिगेशनच्या वतीने सुमारे २१ लाखांची अत्याधुनिक ठिबक सिंचनाची सामग्री सामाजिक दायित्वातुन बसविण्यात येणार आहे.

याबाबत बोलताना जैन इरिगेशनचे पुणे विभागाचे व्यवस्थापक रवि गाडीवान म्हणाले, सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेच्या विनंतीला अजित जैन यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानुसार सह्याद्रीचे सदस्य, वन विभाग आणि पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांसह गडावरील पाण्याच्या टाक्या, उपलब्ध पाण्याचा साठा, त्याचा कालावधी याची पाहणी करत, ठिबक सिंचनाचा आराखडा आमच्या कार्यालयासह वन विभागाला सादर केला. त्याला अजित जैन यांनी मान्यता दिली आहे. संबंधित सर्व विभागांशी समन्वय साधत आम्ही शिवनेरी वरील हिरवाई फुलविण्याबरोबरच जैवविविधता संवर्धनाची कामे करण्यात येतील.'' सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेचे अध्यक्ष संजय खत्री म्हणाले, शिवनेरी विकास आणि संवर्धन प्रकल्पाशी आम्ही पहिल्यापासून निगडित आहोत. विविध शासकीय विभागांशी समन्वय साधत विविध विकासकामे सुचवीत असतो. यामध्ये वन आणि पुरातत्त्व विभागाला सुचविलेल्या विविध कामांना त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. असेच काम आम्ही जैन ठिबक उद्योग समूहाला सुचविले. त्याला अजित जैन यांनी सकारात्मक प्रतिसाद देत निधी उपलब्ध करून दिला आहे. शिवनेरीवरील जैवविविधता संवर्धनासाठी देशी फळझाडांची लागवड आणि संवर्धन आम्ही करु.''

**झाडांचे होणार वृक्षारोपण आणि संवर्धन**

गडावरील जैवविविधता संवर्धनासाठी पक्षी थांबे होण्यासाठी फळ असणाऱ्या वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे. यामध्ये गावरान बोरे, चिंच, आंबा, करवंद, फणस, जांभुळ आदि विविध प्रकारच्या सुमारे १२५ देशी फळ, फुलांची झाडे असणार आहेत.

**शिवनेरी किल्ल्यावर जैन ठिबक म्हणजे छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा – अजित जैन**

शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणा व दूरदृष्टीच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवनेरी हे जन्मस्थळ होय. या किल्ल्यावर वनसंपदा उभारण्यासाठी कंपनीतर्फे अद्ययावत ठिबक सिंचन संच बसविण्यासाठी योगदान खूप महत्त्वाचे आहे. भारतीय संस्कृती जतन करण्याची, त्यासाठी आपल्याकडून हवी ती मदत करण्याबाबत आमचे वडिल भवरलालजी जैन यांची शिकवण आहे. त्यांची शिकवण, तो वारसा आम्हाला मिळाला आहे. सामाजिक बांधिलकी मानून आम्ही शिवनेरी किल्ल्यावर ठिबक सिंचन यंत्रणा बसविण्याचे काम मोठ्या आनंदाने स्वीकारले आहे. महाराष्ट्राच्या रयतेच्या राजाला आमच्यातर्फे हा मानाचा मुजराच अशी प्रतिक्रिया जैन इरिगेशनचे सह व्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांनी दिली.

# इंद्राळ येथे चौधरी कुंटूबियांच्या वतीने हळदी कुंकूवाचा महिला मेळावा संपन्न



**देवणी/शकिल मनियार**

देवणी तालुक्यातील इंद्राळ येथे सौ.गोदावरीताई आनंतराम चौधरी यांच्या वतीने, समाज सेवा हिच इश्वर सेवा म्हणून, दर वर्षी कांही ना कांही गरीब या.जेष्ठ नागरिक, आजी आजोबा यांचा सत्कार निमित्ताने कार्यक्रम इंद्राळ -वडमुरंबी या ठिकाणी आयोजित केला जातो. यंदा पण १४ फेब्रुवारी रविवार रोजी हळदी-कुंकूवाचा महिला मेळावा कार्यक्रम आणि जेष्ठ आजोबा-आजीचा सत्कार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महिला सरपंच प्रभावती ज्ञानोबा पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच कमलाताई म्हेत्रे यांची उपस्थिती होती. पहिल्या प्रथम या महिला हाळदी-कुंकूवाच्या स्थानी स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस सर्व महिलांच्या वतीने दिप प्रजवलित करून विनम्र अभिवादन करण्यात आले आणि चौधरी परिवार-कुंटूबियांच्या गोदावरीताई आनंतराम चौधरी यांच्यावतीने सर्व महिलाचा अनादर ठेवून हाळदी कुंकूवाचा कार्यक्रम निमित्त, सौभाग्याचे लेण म्हणून खनानारळाची ओटीं भरून व पुष्फहार घालून सर्व महिलाचा अदर केला आणि या कार्यक्रमास्थळी सर्व महिला एकमेकांशी प्रेमाणे स्नेहभाव वाढावे अखंड सौभाग्य लाभू दे आशी प्रार्थना करीत महिला एकमेकांशी प्रेमाणे हाळदी कुंकू एकमेकांशी कंपाळी तिलक लाऊन भेट घेत होत्या. या कार्यक्रमास्थळी काही महिला स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्री बाई फुले यांच्या जिवण चरित्रावर प्रकाश टाकला आणि महिला सक्षमीकरण विषयी आणि आरोग्य विषयी स्त्री भ्रुण हत्या अशा अनेक विषयावर महिला ने या ठिकाणी व्याख्याने सादर केले. मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश दाखवते दोन्ही घरी, मुलगी म्हणजेच दोन्ही घर जोडणारी दिपमाळ आहे अशी माहिती प्रत्येक महिला आपल्या व्याख्यानातुन आपआपले मनोगत व्यक्त करीत होत्या. हळदी-कुंकूवाच्या कार्यक्रमाणे हाणूमाण मंदिर परिसर सर्व सुहासनी महिलांनी दुम-दुमत फुलून दिसत होता. गावातील सर्व महिला मोठ्या संख्याने उपस्थित होत्या. सर्व महिलांणा गोदावरीताई चौधरी यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास्थळी गावातील प्रमुख मनमोहन बिरादार, साहेबराव मुळे होते. सुत्रसंचालन निळकंट धोडंगे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंतराम मारोतीराव चौधरी, नामदेव महाराज यांनी परिश्रम घेतले.

# फुड अँड ड्रग्स कंज्यूमर वेलफेयर कमिटीतर्फे मुक्या पाळीव प्राण्यांसाठी मेडिकल कॅम्प!



**मुंबई/प्रतिनिधी**

फूड अँड ड्रग्स कंज्यूमर वेलफेयर कमिटि आयोजित मोफत रेबीज वैक्सीनेशन अँड मेडिकल चेकअप सर्व प्राण्यासाठी हा कार्यक्रम आज मुम्बई कांजुरमार्ग येथे संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे बॉलीवुड अभिनेता ब्रैंडन हिल अभिनेता चार्ली चॅपलिन (रंजन कुमार) अभिनेत्री हर्षदा बामणे संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष्य सुधीर मोरे, नयना मॅडम, डॉ. शशिकांत बामणे, प्रशांत पवार, दिवेश पाष्टे, उदय स्वामी, निकम साहेब व इतर पदाधिकारी यांच्या समवेत एक अगळा वेगळा सामाजिक कार्यक्रम संपन्न झाला.

असा हा अगळा वेगळा प्राण्यांसाठी घेतलेला कार्यक्रम खुप छान पद्धतीने साजरा झाला. या कार्यक्रमामध्ये अनेक लोक वेग वेगळ्या पाळीव प्राण्याना घेवून वॅक्सीनेशन घेण्यासाठी आले होते. कार्यक्रमाचे सूंदर नियोजन झाले होते. सुधीर मोरे आणि डॉ. शशिकांत बामणे यांच्या मार्गदर्शना खाली कार्यक्रमाचे नियोजन योग्य पद्धतीने हाताळले गेले. येणाऱ्या पाहुन्यांचा मान पान, सत्कार, चहा पान अशी सर्व व्यवस्था उत्तमरित्या केली गेली होती. विशेष म्हणजे या कार्यक्रमात इंडियन स्ट्रीट डॉग फाउंडेशनचे संस्थापक राजवीर सिंह यांना आपल्या संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले. तसेच कोरोनाच्या काळामध्ये ज्या लोकांनी व संस्थेनी मुक्या प्राण्यांची देखभाल केली अश्या लोकांना देखील संस्थेकडून सन्मानित करण्यात आले. डॉ. विनोद चव्हाण यानी उत्तमरित्या प्राण्यांना वॅक्सीनेशन देवून प्राण्यांच्या चेहऱ्यावर आनंद समृद्ध केला, असे कार्यक्रम आम्ही आमच्या फूड अँड ड्रग्स कंज्यूमर वेलफेयर कमिटी, महाराष्ट्रतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात राबवनार असल्याचे डॉ. शशिकांत बामणे - संस्थेचे उपाध्यक्ष्य यांनी मुलाखतीत बोलताना सांगितले. व प्राणी मित्रांना आवाहन केले आहे की असे कार्यक्रम राबविण्यासाठी आम्ही तर आहोतच परंतु काही संस्थानी प्राणी मित्रानी व दानशुर व्यक्तिनी पुढे येवून आमच्या संस्थेला मदत करा व इछुकानी आमच्या संस्थेत देखील सहभागी होवून देशाची सेवा करा असे आवाहन डॉ. बामणे यानी तमाम जनतेला केले आहे.

# मोहोळ पोलिसांनी ५८ लाखांच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह सात चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोन्याच्या नकली दागिन्यांना हॉलमार्क लावून व पॉलिश करून बँका, पतसंस्था व सोनाराकडे सोने गहाण ठेवून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीला मोहोळ पोलिसांनी जेरबंद केले असून, अटक करण्यात आलेल्या सात आरोपींकडून ५८ लाख ५ हजार ३१८ रुपयांचा सुमारे ९३० ग्रॅम सोन्यासह साडेसात किलो चांदी व सोने बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल मोहोळ पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी आतापर्यंत इस्माईल युनूस मणियार (रा. सावळेश्वर ता. मोहोळ जि सोलापूर), मनोज मधुकर बनकर (रा. पसेवाडी, ता.आटपाडी, जि.सांगली), बळीराम महादेव यादव (रा.भुताष्टे, ता.माढा, जि सोलापूर), नवनाथ किसन सनगर (कोल्हापूर), योगेश श्रीगुरेलाल शर्मा (रा.सराफ कट्टा सांगली), गौरव संजय अगरवाल, अंकुश अशोक गोयल (दोघेही रा.सराफ बझार जि.हापूड, उत्तरप्रदेश) या सातजणांना अटक करण्यात आली असून पप्पू उर्फ दावल तांबोळी, बबलू उर्फ इसाक पठाण, बबलू उर्फ सद्दाम तांबोळी (रा. सावळेश्वर) व प्रसाद पंडित (कोल्हापूर) हे चारजण अद्याप फरार आहेत. सावळेश्वर येथील गंगा ज्वेलर्सचे मालक मारुती रेवणकर यांना गावातीलच दोघाजणांनी बनावट सोन्याच्या साखळ्या देऊन ६ लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर मोहोळ पोलीस ठाण्यात २६ जानेवारी रोजी इस्माईल मणियार याला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला होता. मनोज बनगर सह माढा तालुक्यातील भुताष्टे येथून बळी जाधव, दिल्लीच्या एजंटांशी संपर्क असणाऱ्या योगेश शर्मा, एजंट नवनाथ सरगर या पाचजणांना पोलिसांनी अटक केली होती.

पोलिसांनी उत्तरप्रदेशमधील हापूड या गावांमध्ये सोनसाखळीना हॉलमार्क लावणारा गौरव अग्रवाल यास मेरठमध्ये ताब्यात घेतले. दिल्लीच्या चांदणी चौकातून साईनाथ कुरिअरच्या माध्यमातून महाराष्ट्रामधील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुण, मुंबई या पाच जिल्ह्यात कुरिअरच्या माध्यमातून सोनसाखळी पाठविणारा अंकुर गोयल यास ताब्यात घेतले.

या तपासामध्ये उत्तरप्रदेश येथून ताब्यात घेण्यात आलेल्या गौरव संजय अग्रवाल याच्याकडून लहान मोठ्या १५४ अंगठ्या, लहान मोठे १० मंगळसूत्र, २० सोन्याच्या साखळ्या, मंगळसूत्राची ९ पेंडल, ११ नेकलेस कानातील व गळ्याच्या साईटच्या पट्ट्या यासह सराफ कट्टा सांगली व पिसेवाडी येथून ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीकडून ९३० ग्रॅम सोने व साडेसात किलो चांदी व नकली सोने बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल असा सुमारे ५८ लाख ५ हजार ३१८ रुपयांचा मुद्देमाल मोहोळ पोलिसांनी हस्तगत केला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर शिंदे, पोलीस निरीक्षक अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक संतोष इंगळे, पोलीस कर्मचारी प्रवीण साठे, शरद डावरे यांनी केली आहे.

# कोरोनाची इतिश्री अद्याप झालेली नाही; सावधगिरी बाळगा -राज्यपाल कोश्यारी



**मुंबई/प्रतिनिधी**

कोरोना संसर्ग देशात येऊन एक वर्ष होत आले. मात्र करोनाची इतिश्री अद्याप झालेली नाही. यास्तव सर्व नागरिकांनी यापुढेही सातत्याने कोरोनाबद्दल सावधगिरी बाळगावी, असे आवाहन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले. अखिल भारतीय क्षत्रिय महासभेच्या वतीने राजभवन येथे विविध क्षेत्रातील ३५ कोरोना योद्धांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र, केरळ यांसह काही राज्यात कोरोनाचे रुग्ण पुनश्च वाढत आहेत. कोरोनासंदर्भात बेफिकीरीने न राहता सावधगिरी बाळगून परंतु निर्भयतेने काम करण्याचे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. जगाच्या तुलनेत भारतात कोरोना रुग्णांची तसेच बळींची संख्या कमी होती. देशातील समाज सेवक, शासकीय कर्मचारी, पोलीस, स्वच्छताकर्मी यांनी कोरोना काळात अतिशय उत्कृष्ट काम केले व त्यांना देशातील दानशूर व्यक्तींनी चांगले सहकार्य केले. त्यामुळेच भारत कोरोनाचा मुकाबला चांगल्या पद्धतीने करू शकला, असे राज्यपाल श्री.कोश्यारी यांनी सांगितले. यावेळी अखिल भारतीय क्षत्रिय महासभेच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षा सुनिता सुमन सिंह व प्रताप सहकारी बँकेचे अध्यक्ष चंद्र कुमार सिंह व्यासपीठावर उपस्थित होते. राज्यपालांच्या हस्ते सायन इस्पितळाचे अधिष्ठाता डॉ. मोहन अच्युत जोशी, केईएमचे अधिष्ठाता डॉ हेमंत देशमुख, शुश्रुषा हॉस्पिटलचे डॉ हर्षद शाह, डॉ. मुकेश अग्रवाल, डॉ. विभा अग्रवाल, समाज सेवक इक्बाल इस्माईल ममदानी, रुग्णवाहिका चालक अनिल आदिवासी, उपजिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, वडाळा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत कांबळे यांसह इतर कोरोना योद्धांचा सत्कार करण्यात आला.

# जनावरे चोरी करणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात!



**उदगीर/करकरे अंबादास**

पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण पोलीसांकडून जनावरे चोरी करणाऱ्या अंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश करण्यात यश आले असून ६ लाख १७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल (जनावरे) हस्तगत करण्यात आली आहेत. उदगीर व उदगीर परीसरात मागील ३ ते ४ महीन्यापासून जनावरे चोरीच्या घटने बाबत विविध पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल झाले होते. याबाबत पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव, उदगीर उप विभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य त्या सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने उदगीर ग्रामीण ठाणे येथील पोलीस निरीक्षक दिपककुमार वाघमारे व गुन्हे प्रगटीकरण पथकातील अमलदार यांना मिळालेल्या गोपनीय माहीती वरून दिनांक ०३/०२/२०२१ रोजी सापळा रचुन आरोपी नामे किशोर सखाराम कांबळे, शरणकुमार नंदकुमार श्रीडोळे दोघे रा. बनशेळकी रोड उदगीर, सुलेमान सलीम सय्यद रा किल्ला गल्ली उदगीर, सद्दाम गुलरसुल कुरेशी रा. हाळी ता उदगीर, गौसपाशा पि. नबी शेख रा. गंडीपेठ मंडल, नरसंगी हैद्राबाद (तेलंगना राज्य) यांना ताब्यात घेवुन त्यांना अटक करण्यात आली असुन जनावरे चोरणाऱ्या अंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश करून त्यांचे कडून विविध गुन्ह्यातील जनावरे चोरी केल्या बाबत एकुण ६ लाख १७ हजार ५०० रुपये किंमतीची जनावरे हस्तगत करण्यात आली आहेत. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव, उप-विभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक दिपककुमार वाघमारे, सपोनि घारगे, पोउपनि पल्लेवाड, गुन्हे प्रगटीकरण १३०८ पोना. ८३५ चंद्रकांत कलमे, पोना. ४३९ माधव केन्द्रे, पोना. १३६८ घोडके, पोकॉ. १७७२ तुळशिराम बरूरे, पोकॉ. १८०५ राहुल गायकवाड, पोकॉ.१५७४ नाना शिंदे यांनी यशस्वी केली.